

# मेहता मराठी ग्रंथजगत

एप्रिल, २०२१
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष एकविसावे
अंक चौथा




२३ एप्रिल
जागतिक पुस्तक दिन
सहर्ष शुभेच्छा !!!
आमच्या सर्व पुस्तकांवर
४०%
सवलत
ऑफर दि. २१ ते २८ एप्रिल
किमान ₹४०००
(नेट ₹२४००)च्या खरेदीवर
९४२०५९४६६५
Pay +91 94223 23039
(एका पुस्तकाची एक प्रत)
मेहता पब्लिशिंग हाऊस | मेहता बुक सेलर्स
sales@mehtapublishinghouse.com
www.mehtapublishinghouse.com

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ एप्रिल २०२१ ◆ वर्ष एकविसावे ◆ अंक चौथा

**संपादक**

सुनील मेहता

**संस्थापक संपादक**

शंकर सारडा

**अंकाची किंमत १५ रु.**

वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**

दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

मेहता पब्लिशिंग हाऊस


## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **विशेष लेख** | १० |
| **विशेष वार्ता** | २८ |
| **पुस्तक परिचय** | |
| शाइन ब्राइट | ३० |
| आयुष्याचा नवा डाव | ३६ |
| कालपटलावरील सुरकुती | ३८ |
| दारातील वादळ | ४० |
| वेगाने कलणारा ग्रह | ४२ |
| अमाप पाणी | ४६ |
| अनुकूल काळ | ४८ |
| **अभिप्राय** | ५२ |
| **दिनविशेष** | ६२ |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

संपादकीय



## आहे कोरोना तरी...

बघता बघता कोरोनाची लाट देशभर पसरून एक वर्ष पूर्ण झालं. या वर्षभरात जग जितकं बदललं तितकाच बदल आपल्या जीवनशैलीतही घडून आला. अनेक संकटातून सावरत सामान्य जीवन हळूहळू पूर्वपदावर येत असताना एकीकडे मनोरंजनाची विविध माध्यमंही सुरू होऊ लागली. संपूर्ण सुरक्षेसह माणसं पुन्हा एकदा घराबाहेर पडू लागली. चित्रपटगृहं, नाट्यगृहं आणि ग्रंथदालनं नव्या उमेदीनं रसिकांच्या सेवेत हजर झाली. आणि एक नवी आशा सर्वच क्षेत्रांतील लोकांच्या मनात बळावू लागली.

मराठी साहित्यरसिक दरवर्षी ज्या सोहळ्याची आतुरतेने वाट पाहत असतात, त्या सोहळ्याची म्हणजेच ९४व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचीदेखील लगबग नुकतीच सुरू झाली होती; पण दुर्दैवाने देशातल्या अनेक भागांत कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे हे संमेलन पुढे ढकलण्यात आलं; मात्र याचा सगळ्यात

मोठा फटका बसला तो संमेलनाकडे आशा लावून बसलेल्या प्रकाशक आणि पुस्तक विक्रेत्यांना! साहित्य संमेलनातील पुस्तकविक्री ही प्रकाशक आणि वितरक यांच्यासाठी मोठी जमेची आणि महत्त्वाची गोष्ट. संमेलनातून मोठ्या प्रमाणावर होणारा पुस्तक व्यवहार हा प्रकाशकांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा असतो. वाचन चळवळ वाढवण्यात पुढाकार घेणारी ही साहित्य संमेलने उत्तम साहित्यकृती योग्य वाचकांच्या हाती पोचवण्याचं मोठं कार्य करत असतात; पण कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे सर्वत्र निराशेचं वातावरण अधिक वाढू लागलं आहे. आशा आहे की, हा संसर्ग आटोक्यात येऊन जनजीवन पूर्ववत होईल आणि साहित्य संमेलनाचा आनंद आपल्याला घेता येईल.

कोरोना काळात पुस्तकविक्रीवर मोठा परिणाम झाला होता. अनेक महिने वाचकांची नव्या पुस्तकांशी गाठभेट होऊ शकली नव्हती; पण अशा परिस्थितीतही नाउमेद न होता आम्ही सातत्याने नवीन अनुवादित पुस्तके आपल्या भेटीस आणत आहोत. त्यापैकी रश्मी बन्सल लिखित आणि मुक्ता देशपांडे अनुवादित 'शाइन ब्राइट' हे पुस्तक म्हणजे यशस्वी उद्योजकांच्या जीवनप्रवासाची कथा सांगणारा प्रेरणादायी प्रवासच आहे. नैराश्याचे सावट सध्या प्रत्येक मनावर पसरलेले असताना आपले मानसिक स्वास्थ्य अनुकूल राखण्यासाठी योग्य त्या मार्गदर्शनाची गरज असते. याच विषयावर शैलजा सेन यांनी 'आयुष्याचा नवा डाव' या पुस्तकातून अभ्यासपूर्ण लेखन केले आहे. नैराश्यासारख्या गुंतागुंतीच्या विषयवार सहज भाष्य करणाऱ्या या पुस्तकाचा सरिता आठवले यांनी तितक्याच सहजतेने मराठीत अनुवाद केला आहे.

लेखिका मॅडेलिन लेन्गल यांच्या **'THE TIME QUINTET'** या गाजलेल्या मालिकेचा मुग्धा गोखले यांनी मराठीत केलेला अनुवाद आपल्या भेटीस येत आहे. या पंचकडीतील पहिले पुस्तक म्हणजे

‘कालपटावरील सुरकुती’ हे असून, यात ‘टेसरॅक्ट’ म्हणजे पाचव्या मितीचा वापर करून काल आणि अवकाशातून प्रवास करून कॅमॅझॉट्झ ग्रहावर अडकलेल्या मेग आणि चार्ल्सच्या हरवलेल्या बाबांच्या शोधाची विस्मयकारक गोष्ट उलगडून सांगितलेली आहे. याच मालिकेतील ‘दारातील वादळ’ या दुसऱ्या पुस्तकामध्ये पृथ्वीच्या विनाशावर टपलेले इक्थ्रॉय आणि प्रोगिनॉस्कीसच्या मदतीनं मेग मरी आणि चार्ल्स यांनी त्यांच्या विरोधात दिलेल्या लढ्याची विलक्षण गोष्ट आहे. ‘वेगाने कलणारा ग्रह’ या तिसऱ्या पुस्तकात पंधरा वर्षांच्या चार्ल्स वॉलेसपुढे उभी ठाकलेली नवी आव्हानं आणि त्याचं मनोबल वाढवण्यासाठी त्याची बहीण मेगने दिलेली साथ कथेला अतिशय आशादायी वळण देत पुढे सरकते. ‘अमाप पाणी’ या चौथ्या पुस्तकात थोडी मोठी झालेली ही मुले काळाच्या सीमा ओलांडून अतिप्राचीन काळातल्या निर्मनुष्य वाळवंटात जाऊन पोचतात आणि पुढे अनेक बऱ्या-वाईट तरी अद्भुत प्रसंगांना सामोरं जाताना घडलेला त्यांचा प्रवास वाचकांना खिळवून ठेवतो. या मालिकेतील शेवटचं पुस्तक म्हणजे ‘अनुकूल काळ’ ज्यामध्ये मेगची मुलगी पॉली अचानकपणे तीन हजार वर्षांपूर्वीच्या काळात खेचून आणली जाते आणि एकाएकी भूतकाळाचं दार बंद झाल्यानंतर घडत गेलेला थरारक अनुभव वाचकांसमोर उभा राहतो.

ही सर्व पुस्तके निश्चितच तुमच्या पसंतीस उतरतील अशी आशा आहे. विविध भाषांमधील उत्तमोत्तम साहित्य अनुवादाच्या माध्यमातून आपल्यापर्यंत पोचवण्यासाठी आम्ही नेहमीच प्रयत्नशील राहू.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

**आमच्या छापील अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

**डिजिटल अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

***Available on***

play.google.com / store / books

www.amazon.in

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**

# मेहता पब्लिशिंग हाऊस

## टी बुक क्लब

BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!

आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक - G Pay +91 94223 23039

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी,
सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ.
विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

amazon — GET IT ON Google Play — Get it on Apple Books

यांच्या संयुक्त विद्यमाने
नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अ‍ॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

**eBooks**

**www.amazon.in**

**play.google.com**

**https://books.apple.com**



**Online** पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

विशेष लेख



## अज्ञाताच्या महाद्वारातून
## वि. स. खांडेकर

**– डॉ. सुनीलकुमार लवटे**

मराठी भाषा आणि साहित्यास भारतीय ज्ञानपीठ पारितोषिक सर्वप्रथम मिळवून देणारे साहित्यकार, पद्मभूषण वि. स. खांडेकर यांच्या या पुरस्काराच्या अनेक आठवणी आहेत. भारतीय भाषा व साहित्यातील सर्वश्रेष्ठ साहित्यकृतीस पुरस्कृत करण्याच्या इराद्याने या पारितोषिकाचा प्रारंभ सन १९६५ला करण्यात आला. वि. स. खांडेकरांना हे पारितोषिक ज्या सन १९७४ वर्षासाठी देण्यात आले, ते या पुरस्काराचे दहावे वर्ष होते. दशकपूर्तीप्रीत्यर्थ दिला जाणारा हा पुरस्कार त्यांच्या ‘ययाति’ या कादंबरीस जरी जाहीर झाला तरी त्या वर्षीपासून भारतीय साहित्यकाराच्या सर्वंकष वा समग्र साहित्याचा आढावा घेण्याची परंपरा सुरू झाली. सन १९८४पासून ती विधिवत अमलात आली.

हे पुरस्कार प्रदान केले जातात, तेव्हा भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्यास अनौपचारिकरीत्या विचारले जाते की तुम्हाला हा पुरस्कार कोणाच्या हस्ते घ्यायला आवडेल? बहुतांश वेळी हे पुरस्कार राष्ट्रपती, पंतप्रधानांच्या हस्ते दिले जातात. खांडेकरांना हा पुरस्कार जाहीर झाला २८ सप्टेंबर, १९७४ रोजी तेव्हा



भारतीय ज्ञानपीठाच्या नियमानुसार पूर्वविजेत्या चार भाषा बंगाली, हिंदी, कन्नड आणि ओडिया वगळता, अन्य अकरा भाषा स्पर्धेत होत्या. प्रवर परिषदेत वि. स. खांडेकरांचं श्रेष्ठत्व जाणणारे गुजराती कवी उमाशंकर जोशी, कन्नड कवी नि कथाकार व्ही. के. गोकाक होते. मराठी भाषा समितीत ज्येष्ठ समीक्षक प्रा. य. दि. फडके, ज्येष्ठ भाषातज्ज्ञ अशोक केळकर व कवी मंगेश पाडगावकर होते. पुरस्कार जाहीर झाला तो काळ आणीबाणीचा होता. पुरस्कार घोषणेनंतर कराड येथे ६ डिसेंबर, १९७५ रोजी ५१वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन योजले होते. त्यात खांडेकरांनी आपल्या भाषणाच्या शेवटी लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या प्रकृतीस आराम पडावा म्हणून प्रार्थना करण्याचे आवाहन केले. त्यास प्रतिसाद देत व्यासपीठावरील अध्यक्ष दुर्गाबाई भागवत, संमेलन स्वागताध्यक्ष तत्कालीन परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाण, उद्घाटक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यासह सर्व उपस्थित हात जोडून उभे राहिल्याचे महाराष्ट्राने अनुभवले, पाहिले आहे.

हा पुरस्कार पदापेक्षा साहित्यिक कार्याने माझ्यापेक्षा श्रेष्ठ व्यक्तीकडून दिला जावा अशी अपेक्षा खांडेकरांनी व्यक्त केली होती. त्यानुसार हा पुरस्कार हिंदीतील श्रेष्ठ कवयित्री महादेवी वर्मा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तोवर हा पुरस्कार त्यांना दिलेला नव्हता. कवयित्री महादेवी वर्मांचं श्रेष्ठत्व खांडेकरांनी लक्षात आणून देताना म्हटलं होतं, की हा पुरस्कार माझ्याआधी त्यांना मिळायला हवा होता. भारतीय ज्ञानपीठाने ते लक्षात ठेवून पुढे सन १९८२ला तो त्यांना बहाल केला. ही असते साहित्यकाराची दृष्टी आणि प्रज्ञा, प्रतिभा!

दूरदृष्टीवरून आठवलं म्हणून सांगतो, सन १९७४ रोजी वि. स. खांडेकरांना हा पुरस्कार मिळाल्यानंतर असं विचारण्यात आलं होतं, की पुढचा भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार कोणत्या मराठी साहित्यिकास दिला जावा?

खांडेकरांनी क्षणाचीही उसंत न घेता कुसुमाग्रजांचं नाव घेतलं होतं. आणि नंतर सन १९८७ला तो त्यांनाच प्रदान करण्यात आला. खांडेकर भविष्यलक्ष्यी साहित्यिक होते खरे!

मराठीत खांडेकरांनी कथा, कादंबरी, लघुनिबंध, पटकथा, समीक्षा असं चतुरस्र लेखन केलं. त्या वेळी खांडेकर-फडके हे मराठी साहित्यातील विवादित द्वंद्व होतं. त्याला अनेक कंगोरे होते. 'कलेसाठी कला' की 'जीवनासाठी कला', लघुनिबंधाचे जनक कोण? वि.स. खांडेकर की प्रा. ना. सी. फडके? ज्येष्ठ समीक्षक डॉ. आनंद यादव यांनी वि. स. खांडेकरांना लघुनिबंधाचे जनक ठरवणारा एक शोधनिबंधच लिहिला होता. तो खांडेकरांच्या वाचनात आला. तो दावा खोडून काढत स्वत: खांडेकरांनी प्रा. ना. सी. फडके यांना जनक म्हणून स्वीकारलं ते कालेतिहासाचा हवाला देऊन. मी लघुनिबंधाचा विकासक असेन; पण जनक प्रा. ना. सी. फडकेच. खांडेकर तसे तत्त्वनिष्ठ नि सत्यनिष्ठ साहित्यिक. 'दूध का दूध, पानी का पानी', 'हा सूर्य हा जयद्रथ' हा त्यांचा प्रघात होता. आचार्य प्र. के. अत्रे त्या काळी नाटक लिहीत आणि स्वत:स नाटककार रा.ग. गडकरी यांचे शिष्योत्तम म्हणवून घेत. एकदा वि. स. खांडेकरांना याबाबत विचारण्यात आलं. त्यांनी सभ्यतेनं खंडन करत म्हटलं होतं की, ''मी इतका काळ गडकऱ्यांच्या सान्निध्यात राहिलो; पण आचार्य अत्रे यांचं कधी तिथं दर्शन झालं नाही.'' मर्यादाशील, सभ्य टीकेचा वस्तुपाठ खांडेकरांनी महाराष्ट्रापुढे ठेवला.

आचार्य प्र. के अत्रेंवरून आठवलं म्हणून सांगतो. वि. स. खांडेकर हे स्वागतशील समीक्षक म्हणून प्रसिद्ध होते; पण त्यांच्या समीक्षेला वस्तुनिष्ठतेची किनार असायची. समीक्षेत सप्रमाण विवेचन करीत. आपल्या एका नाट्य संमेलनातील (१९५८/सातारा) अध्यक्षीय भाषणात वि. स. खांडेकर यांनी असं विधान केलं होतं, की ''जर श्रेष्ठ नाटककारांची पंगत बसली, तर या पंगतीत आचार्य अत्रे येऊन बसू शकत नाहीत.'' आचार्य अत्रेंनी दुसऱ्या दिवशीच्या 'नवयुग'मध्ये पहिल्या पानावर मथळा टाकला होता, 'हा कोड- फुटक्या खांडेकर काय सांगतो?' वि. स. खांडेकर यांच्या अंगा-तोंडावर फुरसं (एक साप) चावल्यापासून कोड उठलं होतं. 'व्यंग्य' नि 'व्यंग' यातला विवेक विसरून केल्या गेलेल्या टीकेनं खांडेकरांचं व्यथित होणं स्वाभाविक होतं. दुसऱ्या महायुद्धोत्तर काळात 'हंस' चित्रपट कंपनीत अत्रे-खांडेकर आलटूनपालटून पटकथा लिहीत. त्यांच्यातील स्नेह, मैत्रीस या

टीकेमुळे विराम मिळाला. खांडेकरांचं या प्रश्नीचं मौन अधिक बोलकं होतं. काळ जाईल तशी आचार्य अत्रेंची अस्वस्थता वाढत होती. खांडेकर मुंबईस जात तेव्हा अत्रेभेटीचा शिरस्ता होता. तो या टीकेने खंडित झाला. एकदा 'स्वामी'कार रणजित देसाई, आचार्य अत्रे यांना त्यांच्या 'शिवशक्ती' कार्यालयात भेटायला गेले असता आचार्य अत्रे यांनी मैत्री तुटल्याची खंत व्यक्त केली. रणजित देसाई यांनी वि. स. खांडेकरांना 'शिवशक्ती'वर घेऊन यायचं आश्वासन दिलं नि ते खांडेकरांना सांगितलं. एव्हाना पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलेलं. खांडेकर निःसंकोच 'शिवशक्ती'वर गेले. तेव्हा 'शिवशक्ती'वर भले भले पायधूळ झाडते व्हायचे; पण अत्रे कधी कुणाच्या स्वागताला खाली आले नव्हते. खांडेकर दोन तास उशिरा गेले. अत्रे दोन तास खांडेकरांच्या स्वागतासाठी तिष्ठत खुर्ची टाकून बसले होते. दोन मित्रांची भरतभेट झाली. अत्रे जातीने लिफ्टमधून खांडेकरांना निरोप द्यायला खाली आले. निरोपाच्या क्षणी गहिवरून म्हणाले, ''भाऊ, तुमच्या अंगावर डाग असतील; पण तुमचं मन गंगेइतकं निर्मळ आहे. आमच्या अंगावर डाग नसतील; पण आमचं मन डागाळलेलं आहे.'' त्या क्षणी उभयतांनी घेतलेली गळाभेट रणजित देसाई यांनी आपल्या 'स्नेहधारा' या आठवण संग्रहात पहिल्या पानावर 'चंद्र-सूर्याची भेट' म्हणून लिहून ठेवली आहे.

'हंस' चित्रपट कंपनीतील एक प्रसंग ओघाने आठवला म्हणून सांगतो. 'प्रभात' चित्रपट कंपनीतून बाहेर पडलेल्या मास्टर विनायक, नटवर्य बाबूराव पेंढारकर नि कॅमेरामन पांडुरंग नाईक या त्रिमूर्तींनी 'हंस' चित्रची स्थापना केली नि पहिला चित्रपट अत्रेंचा काढायचा बेत रचला; पण अत्रे त्या वेळी एका नाटकाच्या लेखनात व्यग्र असल्याने त्यांनी या मंडळींना वि. स. खांडेकरांचं नाव सुचवलं. खांडेकर त्या वेळी कोकणातील शिरोड्याला शिक्षक म्हणून कार्यरत होते, तेव्हा खांडेकरांना पस्तीस रुपये पगार होता. पटकथेला पाचशे रुपयांचं घसघशीत मानधन मिळणार होतं. ही गोष्ट १९३६मधील. खांडेकर कोल्हापूरला पटकथा लिहायला म्हणून आले. त्यांची कंपनीने 'विनायक' बंगल्यात व्यवस्था केली. मुहूर्त ठरला. वि. स. खांडेकरांनी आज दृश्य लिहून द्यायचं आणि उद्या त्याचं चित्रीकरण करायचं ठरलं. संध्याकाळी ठरल्याप्रमाणे खांडेकरांनी दृश्य लेखनाची संहिता मास्टर विनायक आणि बाबूराव पेंढारकरांच्या हाती सोपवली. रात्रभर दोघं डोक्याला डोकं लावून बसले; पण त्यांना काही दृश्य वाचता आलं नाही. खांडेकरांचं

लेखन तुटक असायचं. त्यावेळी ग. दि. माडगूळकर 'हंस' चित्रपट कंपनीत हरकामे म्हणून आलेले. त्यांचं हस्ताक्षर मोत्यासारखं होतं. पटकथेची सुवाच्य नक्कल करायचं काम ग. दि. माडगूळकरांवर सोपवण्यात आलं. 'गीतरामायणकार' झालेले, 'महाराष्ट्राचा वाल्मीकी' म्हणून प्रसिद्धीस आलेले गीतकार ग. दि. माडगूळकर हे खांडेकरांचे लेखनिक होते, हे आज सांगून कोणाला खरे वाटणार नाही; पण दस्तुरखुद्द 'गदिमा' यांनी ही आठवण आपल्या 'तीळ आणि तांदूळ'मध्ये लिहून ठेवली आहे. गदिमा यांच्या तत्कालीन झोपडीवजा घरात एकच छायाचित्र लावलेलं होतं, ते होतं वि. स. खांडेकरांचं; कारण 'गदिमां'च्या प्रत्येक अडचणीच्या क्षणी वि. स. खांडेकर हिमालयाची सावली म्हणून उभे राहत आले होते. त्यांच्यातला गीतकार घडवला तो खांडेकरांनीच. त्यांच्या कितीतरी प्रारंभिक रचना वि. स. खांडेकर यांनी आपल्या 'जोत्स्ना' मासिकात प्रसिद्ध करून प्रोत्साहन दिलं होतं. वाचनाची गोडी त्यांना खांडेकरांनीच लावली. नि शुद्धलेखनाचे पहिले धडे गिरवून घेतले, तेही खांडेकरांनीच. गदिमांनी खांडेकरांबद्दल भरभरून लिहून ठेवलं आहे; पण खांडेकरांनी त्याबद्दल कधी अवाक्षर काढले नाही.

वि. स. खांडेकर 'हंस'मुळे पटकथालेखक झाले. त्यांच्या पटकथांवर सुमारे दोन डझन चित्रपट निघाले. तेही मराठी, हिंदी, तमिळ, तेलुगुसारख्या विविध भाषांमधून त्यांच्या पटकथांचा संग्रह 'अंतरीचा दिवा' म्हणून प्रसिद्ध आहे. हंस चित्रसाठी खांडेकरांनी जी पहिली पटकथा लिहिली त्यावर 'छाया' चित्रपट निघाला. तो हिंदीतही ध्वनिमुद्रित / भाषांतरित करून 'पवित्र प्रेम' म्हणून गाजला. त्या पटकथेस बंगाल प्रेस असोसिएशनचं पहिलं 'गोहर गोल्ड मेडल' मिळालं होतं. त्या वेळी भारतात स्क्रीन पुरस्कार नव्हते. खांडेकरांना 'हंस' कंपनीने देऊ केलेलं पाचशे रुपये मानधन कधीच एकरकमी मिळालं नाही. खांडेकरांची गृहस्थी ओढग्रस्त होती. तशात 'मंदाकिनी' या पहिल्या कन्येचा जन्म झाला. खांडेकरांनी 'बाळलेणं' करण्यासाठी गोहर मेडल मोडलं. आज इतिहासात 'गोहर गोल्ड मेडल'ची फक्त नोंद आहे. खांडेकर यांची दोन वस्तुसंग्रहालयं महाराष्ट्रात उभी आहेत. तिथे सर्व पुरस्कार ठेवले गेले आहेत, नाही फक्त 'गोहर गोल्ड मेडल.' सुसंस्कृत राज्य, राष्ट्रांनी, समृद्ध भारतानी साहित्यिक दरिद्री राहणार नाही, याची काळजी वाहायला हवी होती. त्या मोडलेल्या मेडलचं ते सांगणं आपण कायम लक्षात ठेवायला हवं.

या आणि अशा अनेक आठवणींनी वि. स. खांडेकरांचं चरित्र भरलेलं आहे अन् भारलेलंही. ते नव्या पिढीपुढं आलं पाहिजे. खांडेकर केवळ श्रेष्ठ साहित्यिक नव्हते, तर समाजशील, संवेदनशील माणूस म्हणून मोठे होते. ते पंढरपूरच्या वा. बा. नवरंगे बालकाश्रमास न चुकता भाऊबीज पाठवायचे. महाराष्ट्रात कुष्ठरोग्यांचं पहिलं कार्य सुरू करणाऱ्या शिवाजीराव पटवर्धनांना ते मदत करीत. पुढे तो वारसा बाबा आमटे यांनी चालवला. तेव्हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह 'ज्वाला आणि फुले'ला प्रस्तावना आहे, ती खांडेकरांची. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पहिल्या कादंबरीची 'फकिरा'ची प्रस्तावना खांडेकरांची. दलित साहित्याचं समर्थन करणारं पहिलं पुस्तक 'ध्वज फडकत ठेवूया' लिहिलं खांडेकरांनीच. कुसुमाग्रजांचा पहिला काव्यसंग्रह 'विशाखा' पदरमोड करून प्रकाशित केला खांडेकरांनीच. विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर यांच्या अनुक्रमे 'धृपद', 'धारानृत्य'ची पहिली समीक्षा लिहिली ती खांडेकरांनीच.


## उल्का **वि. स. खांडेकर**

**१९वी आवृत्ती**




तत्त्वनिष्ठ आणि तत्त्वशून्य माणसांमधील संघर्षाचे चित्रण साहित्यामध्ये फार जुन्या काळापासून होत आहे. यात बदलत काय असतील, तर ती तत्त्वं.

'उल्का' या कादंबरीमधील तत्त्वांच्या संघर्षाची पार्श्वभूमी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील आहे. पुनर्विवाह केलेल्या तत्त्वनिष्ठ भाऊसाहेबांची कन्या – तारा, जन्मापासून बंडखोर असते. तारा म्हणजेच भाऊसाहेबांची उल्का. समाजाने या गरीब शिक्षकाला आपल्यापासून दूर सारलेले असते. मोठी होताना उल्का आपल्या भोवतालच्या आत्याबाई, माणिकराव, इंदू, बाबूराव अशांच्याद्वारे माणसं जगताना कशी लबाडी करतात, काय तडजोडी करतात, कसे एकमेकांचे पाय ओढतात, हे तर बघतेच; पण त्याबरोबर तिला भाऊसाहेब आणि चंद्रकांत अशांच्या वागण्यातून प्रखर तत्त्वनिष्ठता पाहायला मिळते.

**किंमत : १८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

विशेष लेख

## श्रीमंत श्री.अनिल मेहता

''एखाद्या गोष्टीचा प्रारंभ नक्की देखणा असावा, मात्र त्याहून त्याहून देखणा असावा तो प्रारंभ केलेल्या गोष्टीचा अंत' - **लाँगफेलो**

आमच्या प्रकाशन व्यवसायातील भीष्माचार्य, ज्यांना मी त्यांच्या मान्यतेशिवाय या व्यवसायातील महागुरू मानतो त्या 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे श्रीमंत श्री. अनिल मेहताजी यांनी नुकतेच ८१व्या वर्षात पदार्पण केले, आपले मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्य राखत स्वत:चा सहस्रचंद्र दर्शनाचा योग घडवून आणला त्याबद्दल सर्वप्रथम त्यांना मन:पूर्वक मानाच्या शुभेच्छा!

म्हणता म्हणता 'एकला चलो रे' न्यायाने या आमच्या महागुरूने व्यवसायाची चक्क ५४ वर्षे पूर्ण केली. 'चढायचेच तर एव्हरेस्ट शिखर, मग आपोआपच बाकीची शिखरे पार करता येतील,' ही या महागुरूची दूरदृष्टी, त्यापोटी निपाणीवरून येतानाच आखलेली भली मोठी चौकट. त्यामुळेच या एका व्यक्तीने सलग ५४ वर्षे प्रकाशनाचा हवाहवासा वाटणारा एवढा मोठा भार खांद्यावर सहज घेतला, तितक्याच सहजतेने स्वत:च्या हिमतीवर लेखकांचा सन्मान जपत सहा हजारांवर पुस्तके प्रकाशित केली. या महागुरूचा अवकाश केवढा मोठा! आंतरराष्ट्रीय मान्यतेचे इयान फ्लेमिंग, मार्क टूली, जेफ्री आर्चर, ग्रेगरी



रॉबर्ट्स, लेखकांबरोबर अरुण शौरी, नानी पालखीवाला, सुधा मूर्ती, खुशवंत सिंग, किरण बेदी, तसलिमा नासरिन अशा कितीतरी देशपातळीवरील लेखकांना मराठी भाषेत आणणे आणि महाराष्ट्रीयन वाचकांमध्ये त्यांना लोकप्रिय करणे हे महाकष्टप्राय काम हे कोण्या येरागबाळ्याचे काम नव्हते. ते शिवधनुष्यही त्यांनी सहज पेलले.

वि. स. खांडेकर, रणजित देसाई, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, आनंद यादव, डॉ. सुनीलकुमार लवटे, व. पु. काळे, द. मा. मिरासदार, महादेव मोरे ते अलीकडचे राजन गवस, विश्वास पाटील, विश्वास नांगरे-पाटील अशा असंख्य मराठी लेखकांच्या हातात दगड देऊन त्यांना सुंदर आणि उबदार घर कसे बांधायचे, त्यांच्या हातात बर्फाचा गोळा देऊन त्यांच्या तापलेल्या मस्तकाला शांत कसे करायचे ही सरकारी वृत्ती याच भीष्माचार्यांने शिकवली. दाढीची खुंटे वाढवित, खांद्यावरील फाटक्या शबनममध्ये आपले हस्तलिखित घेऊन दारोदारी हिंडणाऱ्या आणि त्यामुळे दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आलेल्या प्रत्येक पिढीतील नवलेखकाच्या हातावर उत्तम बिदागी ठेवून याच श्रीमंत श्री. अनिल मेहता यांनी त्यातील अनेकांची बोटे धरून त्यांना लेखकांचा स्वाभिमान शिकवत तितक्याच सहजतेने प्रसिद्धीच्या हमरस्त्यावर आणले आणि त्यांचे नशीबच बदलून टाकले.

या थोर महागुरूचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कोल्हापूरसारख्या महाराष्ट्र राज्याच्या दक्षिणेच्या टोकाकडील सरंजामशाही शहरात राहून, प्रकाशन व्यवसायातील बुद्धिवादी पांढरपेशा मक्तेदारीला तोंड देत त्यांनी बहुजन समाजातील असंख्य लेखकांना घडवले. त्यांना मानमरातब मिळवून दिले. स्वत: अखिल भारतीय प्रकाशक परिषद, फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स या संस्थांच्या माध्यमातून तमाम प्रकाशकांचे प्रश्न शासन दरबारी नेऊन सोडविले. जे कोणालाही जमले नाही ती एक हजारांहून अधिक ई-

बुक्स वाचकांना त्यांनीच उपलब्ध करून दिली.

त्यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधून कित्येक वर्षांनी मी त्यांच्याकडे गेलो होतो. पाहतो तो 'दास डोंगरी राहतो' असे हे भीष्माचार्य पुस्तकांच्या डोंगरात हरवून गेलेले. जवळजवळ तासभर मी त्यांच्याकडे होतो. त्यांनी माझी आस्थेने विचारपूस केली. उठताना मी ८० वर्षे पूर्ण केलेल्या एका प्रसन्न आणि हसऱ्या चेहऱ्याकडे पाहत होतो. मला जाणवत होते, वयोवृद्ध असूनही त्यांचा उत्साही चेहरा एखाद्या पवित्र ठिकाणी पेटवलेल्या मंद, पांढऱ्याशुभ्र मेणबत्तीसारखा वाटत होता... मी कृतार्थ झालो होतो.

'बाळराजे पहाट झाली । आमचा पहारा संपला ।।

म्हणवले तसे आम्ही । हरिनाम म्हटले ।।

त्याचीच एक आठवण ठेवा...'

या वि. म. कुलकर्णी यांच्या ओळी आठवताना माझ्यासमोर उभ्या होत्या त्या त्यांच्या पुढच्या दोन कर्तृत्ववान दोन पिढ्या. निसर्गनियमाप्रमाणे मी आठवत होतो तो तेव्हाच्या देखण्या गोष्टीचा तो प्रारंभ आणि या दोन पिढ्यांमुळे त्यांचा कधीही न होणारा देखणा अस्त...

श्री. अनिल मेहता या 'श्रीमंता'ला पुन्हा एकदा मन:पूर्वक शुभेच्छा!

**-प्रा. सुहास राजेभोसले**

# कुमारभाई : नाबाद ८०

सन १९७० सालातील एक दिवस. अण्णासाहेब भेटावयास आला, म्हणाला, ''कादंबरी पाहिजे प्रकाशनासाठी!'' माझ्या गल्लीतील हा पोरगा पुस्तक विक्रेता म्हणून श्येट्येंच्याकडे होता.''

''कुणाला? श्येट्येंना?'' कोल्हापूरचे चंद्रकांत श्येट्ये तेव्हाचे विख्यात प्रकाशक. नंतरच्या काळात नावारूपास आलेल्या रणजित देसाई, बाबा कदम, डॉ. आनंद यादव, प्रा. चंद्रकुमार नलगे, विश्वास पाटील आदींच्या पहिल्या पुस्तकाचे प्रकाशक.

''आता मी तिथे नाही, 'अजब पुस्तकालय'च्या अनिलभाई मेहतांना कादंबरी हवी आहे. त्यांच्यातर्फे कादंबरीसाठी मी आलोय. त्यांनी प्रकाशनही

सुरू केलं आहे. काही पुस्तकं काढली आहेत त्यांनी. मी तिथे फिरता पुस्तक विक्रेता आहे.''

''हे पाहा, माझ्याकडे सध्या लिहिलेली कुठलीच कादंबरी नाही. नवीन लिहिल्यावर मेहतांना नेऊन देतो.''

''नक्की द्यायची हं आणि कादंबरी प्रसिद्ध होऊन तिचं मानधन मिळाल्यावर मला एक क्वॉटर पाहिजे!''

''देईन की, त्यात काय एवढं?'' मी त्याला अभिवचन दिलं. फिरता पुस्तक विक्रेता म्हणून खूप प्रवास. त्यात तो 'हे' घेत होता.

काही दिवसांनी 'वर आभाळ, खाली धरती' नावाची जोगतिणीच्या जीवनावरील मराठीतील पहिलीच कादंबरी मी लिहिली. डोंगरावरील सौंदत्ती यल्लम्माला जोगतीण-जोगते म्हणून सोडण्याच्या प्रथेवर 'जोगतीण' नावाची एक कथा मी १९६० साली लिहिली होती व ती बेळगावच्या 'दै. तरुण भारत'च्या अंकात प्रसिद्ध झाली होती. माझ्या त्या कथेपेक्षा हा कादंबरीचा आवाका (कॅनव्हास) बराच मोठाही होता. 'करवीर प्रकाशन' असं तेव्हा अनिलभाईंनी प्रकाशनाला नाव दिलं होतं व माझी ही कादंबरी १९७३ साली त्यांनी प्रकाशित केली. तिचं ठरल्याप्रमाणे त्यांनी अडीचशे रुपये मानधनही दिलं; पण मधल्या तीन वर्षांच्या कालावधीत अण्णासाहेब वारला होता; पण त्यापूर्वी त्यानं 'हे' घेणं बंदही केलेलं.

यापूर्वी पुण्या-मुंबईच्या व कोल्हापुरातील इतर प्रकाशकांकडून माझी कथा-कादंबऱ्यांची सात पुस्तके प्रकाशित झाली होती. अनिलभाईंचं 'अजब पुस्तकालय' १९६५ साली सुरू झालं होतं व धंद्यात जम बसल्यावर पुस्तक विक्रीच्या व्यवसायाला समांतर असा प्रकाशन व्यवसायही सुरू केला होता. शिरोली एम. आय. डी. सी.तील सांगली फाट्यावरील हॉटेलमालक श्री. बापूसाहेब गावडे पैलवान यांची 'शिलंगणाचं सोनं' ही ग्रामीण कादंबरी प्रसिद्ध करून त्यांनी आपल्या प्रकाशन व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर प्रा. शरद वराडकर व पेठ नाक्याचे श्री. शंकर खंडू पाटील यांच्या पुस्तकांबरोबर पेठ वडगावच्या हायस्कूलच्या हेड सरांचे एक अनुवादित पुस्तकही काढले होते.

माझ्या 'वर आभाळ, खाली धरती' कादंबरीचं हस्तलिखित घेऊन मी त्यांना भेटायला गेलो तेव्हा एक सुखद योगायोग घडला. अनिलभाई म्हणजे दुसरे-तिसरे कुणी नसून माझ्या निपाणीच्या गुरुवार पेठेतील 'जनरल

स्टोअर्स'चे मालक कै. मेहता शेठजी यांचे ज्येष्ठ चिरंजीव होते व हायस्कूलच्या दिवसांत ते आमच्या हुतुतूच्या टीममध्ये एक खेळाडूही होते. आमच्या हायस्कूलमधील तेव्हाचे पी.टी. शिक्षक कै. वरुटे सर! शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे भूतपूर्व कुलगुरू कै. वरुटे यांचे काका. शिंदे यांना दत्तक गेलेले. कुणी त्यांना शिंदे  सरही म्हणत. आमच्या हायस्कूलमधील सगळेच शिक्षक प्रत्येक विषयांत तज्ज्ञ असे होते. संस्कृतचे काकडे सर मराठीही रसाळपणे शिकवीत. घणमुखी सर गणित-बीजगणिताला होते. दहा-दहा आकड्यांचा गुणाकार एक मिनिटांत करून दाखवित. ड्रॉइंगचे शेख सर निसर्गचित्रांत काळीज ओतीत. तर डॉ. नवाब सर तर दोन्ही हातात दोन खडूचे तुकडे घेऊन एक-दोन मिनिटांत सरसरसर ताजमहालाचे चित्र फळ्यावर काढीत. पवार, कदम, सूर्यवंशी, मुजुमदार, शिंत्रे, रायबागे, यादव, देशमाने आदी इतर शिक्षकही इतिहास, भूगोल, मराठी, हिंदी आदी विषयही चांगले शिकवीत. हे आमचे गुरू सर्व विषयांत ऑलराउंडर होते. आत्तासारखे स्पेशलायझेशन तेव्हा नव्हते. वरुटे सर तर मराठी, भूगोल आदीबरोबर हस्तकलाही (कागदी फुले करणे, पुस्तक बाइंडिंग वगैरे) शिकवीत. त्याचप्रमाणे पी.टी.ही शिकवीत. हेडमास्तर कुलकर्णी मात्र वर्गात कधीही शिकवायला येत नसत. आमच्या हायस्कूलातील तेव्हाची चार-पाच हजारांहून अधिक विद्यार्थ्यांची संख्या दीड डझन शिक्षक व ऑफिस कर्मचारी या मोठ्या मालगाडीचं स्टेअरिंग टीचर्स रूममध्ये बसून जबाबदारीने सांभाळत.

एका वर्षी वरुटे सरांच्या मनात आलं, मराठी चौथी पास होऊन इथे येणारे विद्यार्थी मॅट्रीकपर्यंत अनेक वर्गात विखुरलेले असतात. त्यांना एकत्र आणून त्यांचा परिचय व सहवास घडून यावा म्हणून सर्वच विद्यार्थ्यांची सरमिसळ करून त्यांनी हुतुतु, खोखो, व्हॉलिबॉल, क्रिकेट अशा टीम्स तयार केल्या. त्यामुळे कुमारभाई मेहतांना मी दोन वर्षे सीनिअर असूनही त्यांच्या टीममध्ये आलो. (त्यांच्या सर्कलमधील सारेच त्यांना 'कुमारभाई' म्हणतात. अर्थात या सर्कलमध्ये त्यांच्या गुप्त परीक्षेत पास झालात तरच तुम्हाला प्रवेश, न पेक्षा ठरावीक अंतर ठेवूनच मैत्री करण्यात कुमारभाई पटाईत आहेत.) शाळेत कुमारभाई नेहमी सायकलवरून येत. ही सायकल गिड्डी असे व तिच्या कॅरिअरला पुस्तके लावून निपाणी शहराबाहेरील या भव्य म्युनिसिपल हायस्कूलला दूरवर येईपर्यंत कुमारभाई घामाघूम होऊन जात.

गाजर मोडावं तसा त्यांचा गोरापान गोलमटोल चेहरा शिवारातील जित्रापावर दवबिंदू पडल्यासारखा देखणा दिसे. गोल गुबगुबीत सशासारखे दिसणारे कुमारभाई वर्गातील मुलीने लुब्ध व्हावे, असे होते. आतासारख्या तेव्हा मुली धीट असत्या तर एखादीनं कुमारभाईंना पटविलंही असतं.

१९७० सालापासून मी त्यांच्या प्रकाशनसंस्थेशी विसतंतूच्या धाग्याने बांधला गेलो आहे. ५० वर्षांहून अधिक काळ एखाद्या लेखकाला आपल्या संस्थेशी टिकवून ठेवणे हे कुमारभाईंच्या ऋजु स्वभावाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. त्यांनी काही वर्षांपूर्वी कोठावळेंच्या 'ललित' मासिकात एक मुलाखत दिली होती. त्यात त्यांनी आपल्या प्रकाशन संस्थेचे लोकप्रिय साहित्यिक म्हणून रणजित देसाई, प्रा. डॉ. आनंद यादव यांच्यासह माझाही उल्लेख केला होता. गेली ५२ वर्षे त्यांच्या संस्थेशी लेखक म्हणून मी संबंधित असून, माझी १७ पुस्तके त्यांनी प्रकाशित केली आहेत व त्यातील काहींच्या दुसऱ्या व तिसऱ्या आवृत्त्याही त्यांनी काढल्या आहेत. पुस्तकांचं मानधन वगैरे तोंडीच ठरविलं जाई व या बाबतीत दिलेला शब्द त्यांनी कधीही मोडलेला नाही. काही वेळा तर माझ्या आर्थिक अडचणी माझे पुस्तक प्रकाशनार्थ त्यांच्याकडे नसतानाही भागविलेल्या आहेत. विद्यापीठ हायस्कूलच्या सेवेत असणारे श्री. बाळकृष्ण प्रभुदेसाईंची धनगरांच्या जीवनावरील 'अरण्यक' ही अप्रतिम कादंबरी तर त्यांनी प्रकाशित केलीच, शिवाय प्रभुदेसाईंच्या शेवटच्या आजारपणात त्यांना आर्थिक साहाय्यही केले आहे व त्याबद्दल कुठे एक चकार शब्दही ते बोललेले नाहीत. पैसा सारेच मिळवितात; पण अशी माणुसकी प्रकाशन क्षेत्रात कुठे अभावानेच आढळेल. त्यांनी प्रकाशित केलेल्या 'भोवरा' कथासंग्रहास राज्य पुरस्कार मिळविलेले कामेरीचे रंगराव बापू पाटील आजारी अवस्थेत हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहेत समजल्यावर कुमारभाईंनी त्वरेने फोन करून चौकशी केली. आपल्या लेखकाबद्दलची आपुलकीची भावना मराठी प्रकाशन जगतात तर सध्या दुर्मिळच. भाऊसिंगजी रोडच्या रुंदीकरणात कुमारभाईंचं पूर्ण दुकान जाऊन फक्त तीन फूट जागा उरली होती. तरीही हिंमत न हारता मागच्या बाजूस जागा घेऊन दुसरं पुस्तकालय उभं केलं, या अवधीत उरलेल्या त्या तीन फूट जागेवरच काही पुस्तके उभी करून जवळ एक स्टूल ठेवून कुमारभाई पुस्तके विकत बसत. दुसरा कुणी असता तर हताशपणे बसला असता; पण कुमारभाईंनी ज्या जिद्दीने दुसरं पुस्तकालय उभं केलं त्याला मी मनोमन

सलाम केला! एवढ्यावरच कुमारभाईंचं दुर्दैव थांबलं नव्हतं. आपल्या भावाशी मतभेद होऊन त्यांना विभक्त व्हावं लागलं. तेव्हा त्यांनी लगतचंच एक बंद असलेलं घर विकत घेऊन 'मेहता बुक सेलर्स' हे स्वत:च्या मालकीचं नवीन पुस्तकालय त्या घराच्या ठिकाणी नवी इमारत उभी करून सुरू केलं. पुण्यातही 'मेहता पब्लिशिंग हाऊस' दोन ठिकाणी स्थलांतरित करीत शेवटी स्वमालकीच्या जागेत इमारत उभी करून सुरू केलं. त्याचा भार चि. सुनील यांच्या खांद्यावर टाकला. सुनील पाचगणीच्या इंग्लिश हायस्कूलचे विद्यार्थी. लहानपणी सुट्टीत आले होते, तेव्हा कुमारभाईंनी त्याला माझ्यासह ' द गन्स ऑफ नॅव्हारन' हा दुसऱ्या महायुद्धावरील इंग्लिश चित्रपट पाहायला पार्वती टॉकीजला पाठवलं होतं. चित्रपट संपल्यावर मी छोट्या सुनीलला विचारलं, ''सोडायला येऊ दुकानापर्यंत? चुकणार तर नाहीस ना?'' छोटे सुनील म्हणाले, ''नाही चुकत; तुम्ही जा आपल्या गावी!'' लहान वयातला हा आत्मविश्वास पुढे आपला प्रकाशन व्यवसाय पुण्यात वाढविण्यास त्यांना खूप उपयोगी पडला असावा. कुमारभाई आपल्या भावासह 'अजब'चा कारभार पाहत होते, तेव्हा एकदा मी शनिवारी नव्या पुस्तकाचे हस्तलिखित घेऊन कोल्हापूरला गेलो होतो. करवीर प्रकाशनाच्या पत्त्यावर ताराबाई पार्कात; तर तिथे त्यांचे बंधू राहत होते. म्हणाले कुमार शनिवार पेठेतील घरीच असतात! तसाच चालत भर दुपारच्या उन्हात शनिवार पेठेतील कुमारभाईंच्या घरी आलो, तेव्हा आतमध्ये भाभीही होत्या. त्यांनी मला कलिंगडाचे लालभडक आइसक्रीम खायला दिले. पूर्वी मी कलिंगडाची फोड अनेकदा खाल्लेली; पण असं बशीभर आइसक्रीम मी पहिल्यांदाच खात होतो. आता भाभी हयात नाहीत; पण उन्हाळ्यात कलिंगडे पाहिल्यावर त्या मायाळू माउलीची आठवण येते.

मध्यंतरी कुमारभाईंची हृदयाची दोन ऑपरेशन्सही झाली, तरी ते अजूनही कार्यरत आहेत व दिवसभर दुकान सांभाळतात. त्यांनी ८० पार केली आहे, खरं नाही वाटत! त्यांच्या 'जनरल स्टोअर्स'मधून त्यांच्या वडिलांकडून पाटी व पेन्सिल घेऊन मी मराठी शिकलो व आता त्यांचेच चिरंजीव मी लिहिलेली पुस्तके प्रकाशित करतात, हा योगायोगच म्हणायचा.

मूळचे आमच्या निपाणी-बेळगाव सीमा भागाचे रहिवासी असलेले श्री. अनिल मेहता महाराष्ट्रात जाऊन, कोल्हापूर-पुणे शहरात प्रकाशन व्यवसाय सुरू करून कठोर श्रमाने प्रकाशन विश्वात अग्रस्थान मिळवितात

याचा आम्हा सीमावासीयांना खूप अभिमान वाटतो. दि. ३ मार्च रोजी त्यांनी ८१व्या वर्षात पदार्पण केले आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस आम्हा सर्व सीमाबांधवांच्या शुभेच्छा!

**– महादेव मोरे**

# पुस्तकसम्राट अनिलकाका

*लाखो लोकांमध्ये वाचनसंस्कृती रुजण्यासाठी कारणीभूत असलेले मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक म्हणजे आपल्या सर्वांचे लाडके अनिल मेहता काकांच्या ८१व्या वाढदिवसानिमित्त हा खास लेख...*

आमाला कुणी पुस्तकातला किडा म्हटलं की लै भारी वाटायचं. आता तुमी म्हणशीला पुस्तकातला किडा म्हंजी बाईंनी अभ्यासात झेंडं गाडलं असतील. तर बगा झेंडं तर काय नाय गाडलं आमी. खरं आमाला वाचायचा भारी नाद. आमच्या हातनं कागदाचा चिटोराबी सुटायचा नाय. कळत्या वयात मग पुस्तकं वाचायला चालू केली तवा हातात पयलं पुस्तक कुठलं पडलं असंल तर ते मेहतांचं. आमच्या गावच्या वाचनालयातली बगा मी बगितलेली समदीच पुस्तकं मेहतांची. म्हणलं राव, जर हिथं एवढी पुस्तकं असतील, तर मेहतांकडं केवढी असतील नाय. म्हंजी बगा, पुढं कितीतरी दिस मी राती हेच सपान बगायची की मेहतांच्या पुस्तकाच्या दुकानात मदी मी झोपली हाय अन् माझ्या भोत्यानं निस्ती पुस्तकंच पुस्तकं हाईत.

पुढं दिस गेलं.. महिनं गेलं.. वर्षं सरली. आमी मेहतांची पुस्तकं वाचत वाचत बारक्याचं मोठंबी झालो. ना पुस्तकाचा नाद सुटला...ना वाचायचा... उलटा त्या नव्याकोऱ्या पुस्तकाचा वास त्यांच्या दुकानात वडून न्यायचा. मी लै दिसास्नं मनाशी पक्कं केल्यालं की एक ना एक दिस पुस्तकसम्राट असणाऱ्या अनिल मेहता काकास्नी भेटायचं... खरं ते कुठलं खरं व्हतंय. आमी त्या भवानी मंडपातनं दुकानात काकास्नी भेटाया शिरणार त्योच उसनं अवसान गळणार अन् आमी माघारी फिरणार. असं लई येळा झाल्यावर ठरवलं आता आपण या दुकानात जायचं ते आपलं पुस्तक घ्यूनच.

अन् आमच्या भाग्यानं त्यो दिसबी आलाच. आमी अगदी थाटात दुकानात शिर्लाव. अन् समोर खुर्चीवर मेहता काकास्नी बगून परत आमची बोलती बंद. मग काकांनीच पुढाकार घ्यून इचारलं,

''कुठून आलीस? पहिलंच पुस्तक आहे काय?''

तसं काकांचं व्यक्तिमत्त्व एकदम शांत.. संयमी.. बरं का.. तरीबी का कुणाला दकल आमाला तर घामटा फुटलेला. आमी दबकतच म्हणालो,

''होय. पहिलंच पुस्तक. तशी मी पुण्याची... खरं कोल्हापूर माझं सासर आणि निपाणी हे माझं माहेर..''

आणि तुमाला सांगतो, निपाणी म्हणल्यावर काकांचा चेहरा उजळला. मला म्हणालं,

''बैस..बैस.. तू निपाणीची, म्हणजे माझ्या गावची.''

काकांस्नी निपाणीबद्दल लई आपलेपणा बगा. तिथल्या माणसांबद्दलबी आत्मीयता...

मग काय इचारता. काकांनी खुश व्हत पुस्तकाची पाने उलटून पाहिली. पुस्तकाबद्दल माहिती इचारली. त्या येळंला मला काय वाटलं तुमाला काय सांगू. मेहता काकांच्या हातामदल्या पुस्तकाकडं बगताना त्या पुस्तकाचा जरा हेवाच वाटला बगा. त्या पुस्तकाचं भाग्य थोर की ते पुस्तकाच्या राजाच्या हातात इराजमान झालेलं. मी जरा बिचकतच म्हणलं, की येळ मिळाला तर जरूर वाचा.

काकांचा निरोप घ्यून आमी उड्या मारतच घरला पोचलो. काकास्नी पुस्तक दिल्याचा... भेटल्याचा आनंद लै मोठा व्हता. एक दिस त्या धुंदीत गेला.. अन् दुसऱ्या दिशी दुपारी एका नंबरवरनं फोन आला.. कुणाचा असंल म्हणून उचलून बगितलं... तर...

''हॅलो, मी अनिल मेहता बोलत आहे. तुझ्या पुस्तकातील पहिली 'अवदस' कथा वाचली. अप्रतिम झाली आहे. तू आता एक कर, सगळ्यात पहिलं, हे पुस्तक साहित्य अकादमीला पाठव...''

आयला.. काय सांगू.. या शब्दांनी मी तीनताड उडालो की राव.. म्हंजी बगा.. ज्यांनी माझं पुस्तक एक नजर निस्ता बगावं म्हणून मी देवाला साकडं घालायची. त्यातल्या त्यात त्येंनी जरी बगितलं तरी तेंच्याकडं हजारोनं पुस्तकं येणार. त्यात आमच्या पुस्तकाचा कवा नंबर लागायचा असं वाटायचं. तवा तसं आमी मनाला तंबीच दिलेली की आता सहा महिन्यापतूर तर पुस्तक

वाचलं का म्हणून इचारायला जायचं धाडस करायचं नाय. अन् ध्यानीमनी नसताना काकांचा फोन आल्यावर मी कितव्या आसमानवर पोचलो ते काय इचारू नका.. आता आमाला ३६ वय असल्यानं आमी अकादमीला पुस्तक पाठवू शकलो नाय ती गोष्ट येगळी. खरं काकांच्या ह्या प्रतिक्रियेनं अंगात दहा हत्तींचं बळ आलं. अन् एक जबाबदारीची जाणीवबी... एवढं मोठं माणूस आपलं कौतुक करतात.. आपल्याला प्रोत्साहन देतात, ही गोष्ट माझ्यासाठी लै मोठी व्हती.. खरं सांगायचं तर ह्यो आनंद असा व्हता की पुढलं कितीतरी दिस आमी येगळ्याच जगात वावरत व्हतो...

आमाला सगळ्यात जास्त आभाळाएवढा आनंद कवा झाला सांगू... जवा आमी आमच्या पयल्यावयल्या पुस्तकाच्या प्रकाशनाला काकास्नी बलावलं अन् ते तयार झालं तवा. तसं तर बगा वयोमानानं काका कुठं जास्त जात नाहीत. खरं ते मला म्हणालं तुझ्या कार्यक्रमाला मी जरूर येतो. ते कार्यक्रमाला आलं.. निस्तं आलं नाहीत तर पुस्तकाबद्दल भरभरून बोललंबी.. आपल्या निपाणीच्या पोरीबद्दलचा अभिमान तेंच्या शब्दाशब्दातून ओसंडत व्हता. त्या दिशी आमी भरून भरून पावलो.

तसं तर काकांबद्दल बोलायला आमी बसलो तर ही फेसबुकची पानं पुरायची नाहीत. अन् तसंबी 'अनिल मेहता' हे नावच एवढं बोलत आलंय की आमी पामरांनी तेंच्यावर काय बोलावं...

न थकता, न थांबता अविरत ते अजूनबी दुकानात येतात. आगत्यानं येणाऱ्या माणसासंगठनी बोलत्यात. मेहता काका म्हंजी ऊर्जेचं भांडार हाईत. त्येंचा उत्साह बगून एक निराळीच ऊर्मी मिळती. महादेव मोरे काका त्यांना कुमार म्हणत्यात. त्यांच्याकडनं कुमार ऐकताना खरंच भारी वाटतं.

मेहता पुस्तक जगताबद्दल बोलायला एक पुस्तकच काढायला पायजेल बगा. किंडल असू दे.. ई-बुक असू दे... वा नवी कुठलीबी टेक्नॉलॉजी.. समद्या नव्या तंत्राशी जुळवून बदलाला सामोरं जात आपल्या पुस्तकाचा झेंडा सातासमुद्रापार पोचवलेल्या अनिल मेहता काकांचा वाढदिवस.. तेंच्या ८१व्या वाढदिवसाला आमी त्येंच्यासाठी 'निरोगी आरोग्य लाभो' अशी प्रार्थना करतो.

**– सुचिता घोरपडे**

# रिक्षामधील फिरते वाचनालय

बालगोपाळांपासून ते आबालवृद्धांपर्यंत सारेच जण सोशल मीडियाच्या मायाजालात अडकून पडले आहेत. या आभासी विश्वात तासन्तास रमणारे लोक वाचनाकडे पाठ फिरवत आहेत. त्यामुळे वाचनसंस्कृती लोप पावत आहे, अशी ओरड ऐकायला मिळत आहे. पुन्हा एकदा वाचनसंस्कृती वाढावी, यासाठी एका युवतीने चक्क रिक्षामध्ये फिरते वाचनालय सुरू केले आहे. प्रियांका चौधरी असं या युवतीचं नाव आहे.

मूळच्या यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड या गावच्या रहिवासी असलेल्या प्रियांका या गेल्या सहा-सात वर्षांपासून शिक्षणानिमित्त पुण्यात स्थायिक आहेत. राज्यशास्त्र या विषयातून पदव्युत्तर पदवी पूर्ण केलेल्या प्रियांका सध्या पीएच.डी. करत आहेत. त्यांना सामाजिक कार्याची प्रचंड आवड. लोकांमध्ये वाचनाची आवड पुन्हा निर्माण व्हावी यासाठी त्यांनी वाचन चळवळ सुरू केली. शिक्षणाचं माहेरघर आणि साहित्याचं केंद्र असलेल्या पुणे शहरात त्यांनी खुले वाचनालय सुरू केले होते. वाचनालय सुरू करण्यापूर्वी त्यांनी लोकांना पुस्तके देणगी देण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या या आवाहनाला लोकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. बघता



बघता चाळीस हजारांहून अधिक पुस्तके त्यांच्याकडे जमा झाली. ही सर्व पुस्तके त्यांनी या वाचनालयाला दिली. आज वाचकप्रेमी इथे येऊन पुस्तके वाचतात. सध्या महाराष्ट्रात तब्बल ४५ खुली वाचनालये सुरू आहेत. महापुरुषांच्या विचारांचा वारसा टिकून राहावा, यासाठी प्रत्येक वाचनालयाला महापुरुषांची नावे देण्यात आली आहेत.

प्रियांका आपल्या रिक्षातील लायब्ररीविषयी सांगतात की, आम्ही महाराष्ट्रात खुले वाचनालय सुरू केले आहे. याला चांगला प्रतिसाद मिळाला; पण मराठी साहित्य टिकलं पाहिजे, ते वाढलं पाहिजे यासाठी काहीतरी नवे करावे, असा विचार करत असताना फिरत्या वाचनालयाची संकल्पना मनात आली. प्रशांत कांबळे नावाचे एक वाचक त्यांच्या वाचनालयास भेट देण्यास आले होते. तेव्हा प्रियांका यांनी त्यांच्या ऑटो रिक्षामध्ये हे फिरते वाचनालय सुरू करण्याची संकल्पना मांडली. वाचनप्रेमी असलेल्या प्रशांत यांनी तात्काळ होकार दिला.

त्यानंतर मराठी भाषा दिनी कुसुमाग्रज फिरते वाचनालय सुरू झाले. ऑटो ड्रायव्हरच्या पाठीमागे पुस्तके ठेवण्यासाठी एक कापडी पॉकेट तयार केले.

या पॉकेटमध्ये विविध प्रकारची मराठी पुस्तके वाचनासाठी ठेवली आहेत. वाचनालयातलं पुस्तक जर का प्रवाशाला आवडलं तर ते त्यांच्या घरी घेऊन जाऊ शकतात; पण त्यासाठी अट एकच आहे की, त्यांनी वाचलेले पुस्तक पुन्हा दुसऱ्या कोणालातरी दिले पाहिजे. वास्तविक पाहता वाचनालय म्हटलं की पुस्तकांचा खजिना, अवतीभोवती वाचकप्रेमींचा घोळका, हे चित्र डोळ्यांसमोर येते. या साऱ्या गोष्टींना छेद देत चक्क ऑटो रिक्षामध्ये सुरू केलेले वाचनालय वाचकप्रेमींचे लक्ष वेधून घेत आहे.



## विश्वास नांगरे पाटील लिखित 'कर हर मैदान फ़तेह' पुस्तक लवकरच इंग्रजी आणि हिंदीत

पुणे- मुंबईचे पोलीस सहआयुक्त विश्वास नांगरे पाटील यांचे 'कर हर मैदान फ़तेह' हे आत्मचरित्रपर पुस्तक २६ जानेवारीच्या मुहूर्तावर प्रकाशित झाले. प्रकाशनपूर्व सवलतीत या पुस्तकाच्या दोन आवृत्त्या संपल्या असतानाच या पुस्तकाला प्रकाशित होऊन पंधरा दिवस उलटण्यापूर्वीच याच्या इंग्रजी आणि हिंदी भाषांतरासाठी मागणी आली आहे. यासंबंधीचे करार नुकतेच पार पडले असून, लवकरच हे पुस्तक हिंदी आणि इंग्रजी वाचकांसाठी उपलब्ध होणार आहे.


एका पोलीस अधिकाऱ्याचं आयुष्य म्हणजे रोज नव्या आव्हानांचे गड सर करणं. या लढ्यांची रंगीत तालीम त्याच्या प्रशिक्षण कालावधीत होते. त्यातनं सामाजिक सुरक्षा कवच मजबूत करण्याचे वस्तुपाठ मिळतात. हे वस्तुपाठ आणि त्यांचा प्रत्यक्ष जीवनातील अंगीकार, जगणं अधिक आशयसंपन्न करतात. 'कर हर मैदान फ़तेह' असाच आशयसंपन्न जीवनाचा आरसा आहे. जानेवारी २०२१मध्ये मेहता पब्लिशिंग हाऊसने हे पुस्तक प्रकाशित केले. त्यानंतर अवघ्या पंधरा दिवसांच्या कालावधीत या पुस्तकाच्या इंग्रजी आणि हिंदी

अनुवादासाठी तीन राष्ट्रीय प्रकाशन संस्थांचे प्रस्ताव आले होते. यापैकी हार्पर कॉलीन्स इंडिया या प्रकाशन संस्थेचा प्रस्ताव मंजूर झाला आहे. या संस्थेसोबत 'कर हर मैदान फ़तेह' पुस्तकाच्या हिंदी आणि इंग्रजी अनुवादासाठीचा करार नुकताच पूर्ण झाला असल्याची माहिती मेहता पब्लिशिंग हाऊसचे व्यवस्थापकीय संचालक सुनील मेहता यांनी दिली. इंग्रजी आणि हिंदी अनुवादाबरोबरच या पुस्तकाच्या इतर भारतीय भाषांतील अनुवादाबाबतही प्रकाशकांशी बोलणी सुरू आहेत. जानेवारी महिन्यात हे पुस्तक प्रकाशित होण्यापूर्वी प्री-बुकिंग घेण्यात येत होते. या बुकिंग दरम्यानच पुस्तकाची पहिली आवृत्ती संपली होती. प्रकाशनानंतरच्या अवघ्या एका महिन्यात पुस्तकाची तिसरी आवृत्तीही प्रकाशित झाली असल्याचेही सुनील मेहता यांनी सांगितले. कोरोनाच्या प्रभावातून अजूनही प्रकाशन व्यवसाय पुरेसा सावरलेला नाही. अजूनही पुस्तक विक्री रुळावर आलेली नाही. अशा अवस्थेत एखाद्या पुस्तकाच्या महिन्याभरात तीन आवृत्त्या निघणं हे आशाजनक असल्याचेही ते म्हणाले.


## हार्दिक अभिनंदन!



जनमंगल आणि महाराष्ट्र पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने भावेशजी भाटिया यांना **'महाराष्ट्र नवरत्न पुरस्कार'** जाहीर करण्यात आला. नाशिक येथे होणाऱ्या अधिवेशनात हा पुरस्कार देण्यात येईल.




डॉ. भावेशजी भाटिया यांचे पुस्तक **'रुक जाना नहीं... '** मेहता पब्लिशिंग हाऊसने मराठीत प्रकाशित केले आहे. डॉ. भावेशजी भाटिया यांचा प्रेरणादायी प्रवास या पुस्तकरूपाने समोर येतो. हजारो दृष्टिबाधितांच्या आयुष्यात त्यांनी प्रकाश पेरला आहे. त्यांच्या कार्याचा हा यथोचित गौरव आहे. भावेशजींचे मन:पूर्वक अभिनंदन!




# शाइन ब्राइट

**रश्मी बन्सल** । अनुवाद : **मुक्ता देशपांडे**

*एखादा उद्योजक ज्या गोष्टी करू शकतो त्याच तुम्ही नोकरीच्या कक्षेत राहूनही करू शकत असाल तर?*

*'शाइन ब्राइट' अशाच काही प्रेरणादायी प्रवासांचा लेखाजोखा सादर करतं, जे एकाच वेळी कष्टसाध्यही आहेत आणि समाधान देणारेही आहेत.*

*कोणत्याही नोकरीत तुम्ही 'अडकलेले' नसता, तुम्हीही बदल घडवू शकता– एक 'उद्योजक' बनू शकता...*

'शाइन ब्राइट' म्हणजे यशस्वी उद्योजक असलेल्या सीईओंच्या प्रेरणादायी कथा. या पुस्तकाच्या मूळ लेखिका रश्मी बन्सल असून, याचा मराठी अनुवाद मुक्ता देशपांडे यांनी केला आहे. प्रत्यक्षात एखाद्या कामाची, स्वप्नाची मालकी नसतानाही 'आपलेपणाची मालकी' असण्याची भावना जेव्हा निर्माण होते, तेव्हा ते काम 'अंतरीची हाक' बनून येते. आणि जेव्हा काही लोक 'अधिक काही करण्यासाठी', 'अधिक काही बनण्यासाठी' झपाटलेले असतात तेव्हाच खासगी, सार्वजनिक, सामाजिक आणि सरकारी क्षेत्रात आश्चर्यकारक गोष्टी घडू शकतात.

**पवन गोयंका -** एक संशोधक शास्त्रज्ञ म्हणून आयुष्याची सुरुवात करणारे पवन गोयंका नंतर एका मोठ्या भारतीय कुटुंबाच्या मालकीच्या कंपनीत एका स्टार्ट-अप प्रकल्पाचे प्रमुख म्हणून दाखल झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली जागतिक स्तरावरच्या बड्या धेंडांशी महिंद्रा ऑटो आता स्पर्धा करत आहे आणि त्यांच्यापेक्षा सरस कामगिरी करून दाखवत आहे. महिंद्रासाठी जागतिक दर्जाचं संशोधन आणि विकास केंद्र (R D Centre) उभं करणारे पवन गोयंका स्वतःला सिद्ध करण्याची इच्छा, अथक परिश्रम, निश्चित ध्येय आणि संयम यांची सांगड घालत नवा इतिहास रचतात.

**मनू जैन -** एका चांगल्या चालत असलेल्या स्टार्ट-अपचं सहसंपादकपद सोडून दुसऱ्यासाठी काम करणरे मनू जैन एक वेगळा विचार करून मोठी ध्येयं डोळ्यांसमोर ठेवतात. टीव्हीवर कोणत्याही प्रकारची जाहिरात न करता, चौकाचौकात होर्डिंग्ज न लावता किंवा कोणत्याही तारे-तारकांची, सेलिब्रिटींची मदत न घेता शाओमी हा भारतातला सर्वाधिक खपाचा ब्रॅन्ड ठरला आहे. आणि हे सगळं शक्य झालं ते मनू जैन यांच्या प्रयत्नांमुळे. वस्तूचे उत्पादन, आपल्या कामाविषयी कळकळ आणि चिकाटी या त्रिसूत्रीच्या साहाय्याने मनू जैन यांनी शून्यातून विश्व निर्माण करण्याचं स्वातंत्र्य मिळवलं.

**विनीत गौतम -** आजच्या डिजिटल युगातही कारखाने आणि दुकानं उभारून नफा मिळवण्याचं स्वप्न तरुणांना विकणारे वल्ली म्हणजे विनीत गौतम. अनुभवांच्या ज्वाळांवर तुमचं कौशल्य, तुमची मानसिक स्थिती, तुमची वैयक्तिक नेतृत्वशैली यांचं मिश्रण जेव्हा खदखदू लागतं तेव्हा तुम्ही तरबेज होता असं म्हणणारे विनीत अनुभवांचं गाठोडं घेऊन पुढे जाताना दिसतात. २०१० साली विनीत गौतम यांनी एका डॅनिश कंपनीत नोकरी

केली, ज्या कंपनीचं नाव भारतात कुणी ऐकलंही नव्हतं. त्यानंतर २०१५च्या अखेरीस बेस्टसेलर इंडियाची १००पेक्षा जास्त दुकानं आणि २०००पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांच्या साहाय्यानं ९९७ कोटी रुपयांचा विक्रमी आकडा गाठत नवा इतिहास रचला.

**नितीन परांजपे -** कंपनी जितकी जुनी तितकीच तिची काम करण्याची पद्धत रूढ झालेली आणि ठरून गेलेली असते. मग येतो एक नेता, जो लोकांची महत्त्वाकांक्षा फुंकर घालून चेतवतो. त्यांच्यातली निद्रिस्त प्रतिभा जागी होते आणि ती अशा गोष्टी पाहते आणि करते ज्या त्यापूर्वी कधीच पाहिल्या आणि केल्या गेल्या नव्हत्या. एक व्यवस्थापन प्रशिक्षणार्थी म्हणून हिंदुस्तान युनिलिव्हर (HUL) मध्ये रुजू झालेल्या आणि वयाच्या ४६व्या वर्षी (CEO) पदाला पोचलेल्या नितीन परांजपे यांचा हा प्रवास एक 'स्वप्नवत प्रवास' होता असं आपण म्हणू शकतो. परंतु, सूत्रं हाती घेतल्यानंतर काही महिन्यांनीच जगभर मंदीची लाट आली. व्यवसायवृद्धीसाठी बाहेरच्या वातावरणाला तोंड देण्यासाठी स्वतःच्या आत डोकावून नितीन यांनी कसा मार्ग शोधला, लोकांची मनोवृत्ती, मनोवस्था आणि आकांक्षा यात कसा बदल केला त्याची ही गोष्ट अत्यंत प्रेरणादायी आहे.

**आर. मुकुंदन -** जर तुम्ही स्वतःत बदल घडवलात, तरच तुमची प्रगती आणि भरभराट होते. एखादा उद्योग काळाच्या कसोटीवर दीर्घ काळ टिकवायचा असेल तर उद्दिष्टाची व्यापक जाणीव असणं आवश्यक आहे. 'आपलं छान चाललंय' असं म्हणणाऱ्या एका महाकाय जहाजाला एखाद्या धाडसी, नवीन दिशेला तुम्ही कसं ओढून न्याल? याचं आव्हान टाटा केमिकल्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पदभार सांभाळणारे आर. मुकुंदन यांच्यासमोर होतं. गेल्या एक दशकापासून कंपनी स्वतःला एक औद्योगिक रासायनिक सर्वेसर्वा या स्वरूपाकडून नावीन्याचा ध्यास घेतलेल्या ग्राहकाभिमुख स्वरूपाकडे हळूहळू घेऊन जात स्वतःमध्ये बदल घडवत आहे. अडथळे दूर करणं, वळसे घालून मार्ग सुकर करणं आणि नवीन रस्ते आखणं हे काम करत आर. मुकुंदन यांनी केवळ पैसा न कमवता जीवतोड प्रयत्न करणं आणि सेवा देणं हे आपल्या कामाचं ब्रीद बनवलं. एक असा प्रवास निवडला, ज्यातून आपण धडे घेऊ शकतो. असे धडे जे व्यावसायिकतेच्या, उद्योजकतेच्या मार्गावरून जाणाऱ्यांना पथदर्शक ठरू

शकतात.

**हर्ष भानवाला -** स्वतःबद्दलचा विश्वास आणि खात्री ठासून भरलेला माणूस म्हणजे हर्ष भानवाला. NABARD ( National Bank for Agricultural and Rural Development - शेती आणि ग्रामीण विकास राष्ट्रीय बँक) सारख्या संस्थेत पदभार सांभाळताना अगदी गरिबातल्या गरीब व्यक्तीसोबत कसं काम करायचं, रोजानं काम करणाऱ्यांना आपण स्वयंपूर्ण उद्योजक वर्गात कसं घेऊन यायचं, याचा विचार हर्ष भानवाला सतत करत राहायचे. 'तुम्ही जितकं कमावता त्याचा काही हिस्सा दान करावा,' या शिकवणुकीनुसार फक्त काहीतरी मिळवत राहण्याची इच्छा त्यांना कधीच झाली नाही. सार्वजनिक संस्थांबरोबर काम करत असताना लक्षात ठेवण्याचं अगदी पहिलं मूलभूत तत्त्व सांगताना ते म्हणतात की, 'एखाद्या बाबतीत जर तुमचा निहित स्वार्थ असेल, तर तुम्ही कुठेच उभे राहू शकत नाही. कष्टानं काम करणं जितकं महत्त्वाचं तितकंच हुशारीनं काम करणं महत्त्वाचं आहे.' हर्ष भानुवाला आव्हानांना तोंड देण्याची तयारी ठेवण्याचा सल्ला देतात.

**अमिताभ कांत -** मलबारच्या किनारी प्रदेशात उपजिल्हाधिकारी असल्यापासून अमिताभ कांत स्वतःकडे 'बदल घडवणारा' म्हणून पाहत आले आहेत. प्रत्येक नोकरीच्या ठिकाणी, प्रत्येक विभाग, प्रत्येक सरकारसोबत काम करताना त्यांची ही मनोवृत्ती त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत कायम त्यांच्यासोबत राहिली. भारतीय प्रशासकीय सेवेतील नोकरी (IAS) म्हणजे आरामाची नोकरी असं बहुतेक लोकांना वाटतं; पण थोड्या, अगदी थोड्या लोकांना ती बदल घडवण्याची एक संधी आहे हे कळून येतं. अमिताभ कांत यांना व्यवस्थेबरोबर वाहत जाण्यात काही अर्थ नसून, तुम्ही मागे कसा ठसा सोडता हे समजलं होतं. आपल्याला मिळालेला अल्प कार्यकाळ हा समोर असलेल्या अनेक आव्हानांपैकी एक असून, त्या संधीचा अमिताभ कांत यांनी पुरेपूर उपयोग केलेला आहे. भारतात व्यवसाय करणं लोकांसाठी थोडं सोपं व्हावं या हेतूने १३०० कायदे कालबाह्य ठरवून रद्द करत अमिताभ कांत यांनी एक महत्त्वाचं पाऊल उचललेलं आहे.

**चित्रा गुप्ता -** एक शिक्षक म्हणून चित्रा गुप्ता यांनी उत्तमतेचा ध्यास घेतला आणि आपल्या वर्गासाठी अप्रचलित, अपारंपरिक कल्पना राबवून नवनवीन प्रयोग केले. अडीच दशकांच्या कारकिर्दीनंतर, मुख्याध्यापिका म्हणून नियुक्ती झाल्यावर चित्रा यांनी एक धाडसी, नवीन स्वप्न प्रत्यक्षात

उतरवलं. एका विशेष प्रगती न करणाऱ्या मुलींच्या सरकारी शाळेचं रूपांतर त्यांनी एका उत्कृष्ट संस्थेत केलं. आधी एक शिक्षक म्हणून आणि मग मुख्याध्यापिका म्हणून, आपल्या विद्यार्थिनींचं कल्याण हे बाकी कशाहीपेक्षा चित्रा यांना अधिक महत्त्वाचं होतं. त्यांनी सगळ्या प्रकारच्या युक्त्या-क्लृप्त्या वापरल्या, अधिकारवाणीनं सांगण्यापासून ते प्रेमळपणे समजावण्यापर्यंत, भावनांना आवाहन करण्यापासून ते शक्कल लढवण्यापर्यंत सगळ्या गोष्टी केल्या. १०वी आणि १२वी चे निकाल ५०टक्क्यांच्या आसपास रेंगाळत असलेल्या शाळेनं २०१० साली १०० टक्के निकाल दाखवत सगळ्यांना आश्चर्याचा मोठा धक्का दिला.

शाळेच्या CEO म्हणून चित्रा गुप्तांनी मुलींच्या मनात स्वप्नांची बीजं रोवली. काहीतरी करून दाखवण्याची तळमळ जागवली आणि या सगळ्याला कृतीची जोड दिली. दिल्लीतल्या आणि दिल्लीबाहेरच्यासुद्धा सरकारी शाळांच्या प्राचार्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमात 'झीनत महल मॉडेल ऑफ स्कूल मॅनेजमेंट' हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे.

या सर्व यशस्वी उद्योजकांच्या कथांवरून एक गोष्ट समजते की, आपण काहीतरी करू शकतो, काहीतरी बनू शकतो असं जर माणसाला मनापासून वाटत असेल तर तो नक्कीच यशस्वी होतो.

**रश्मी बन्सल यांचे आम्ही प्रकाशित केलेले इतर साहित्य**

**स्वप्नांचे इंद्रधनू । टेक मी होम । अराइज, अवेक । कनेक्ट द डॉट्स । आय हॅव अ ड्रीम**




८ एप्रिल

‘स्वामी’कार

# रणजित देसाई

यांच्या जन्मदिनानिमित्त

**खास ऑफर**



**४२ पुस्तकांचा ₹६,६०५चा संच फक्त ₹४,२९५मध्ये**













**कादंबरी**

स्वामी
श्रीमान योगी
अभोगी
राधेय
पावनखिंड
माझा गाव
समिधा
बारी
राजा रविवर्मा
प्रतिक्षा
शेकरा
लक्ष्यवेध

**कथासंग्रह**

संकेत
कातळ
रुपमहाल
मोरपंखी सावल्या
आषाढ
मधुमती
वैशाख
मेघ
मेख मोगरी
प्रपात
कमोदिनी
गंधाली
बाबुलमोरा
आलेख

**नाटक/एकांकिका**

संगीत तानसेन
सावली उन्हाची
हे बंध रेशमाचे
पंख जाहले वैरी
धन अपुरे
कांचनमृग
रामशास्त्री
वारसा
श्रीमानयोगी
लोकनायक
तुझी वाट वेगळी
स्वामी
पांगुळगाडा
गरुडझेप

**ललित**

स्नेहधारा
संचित

ऑफर दि.१५ एप्रिल पर्यंत

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ✆ : (०२०) २४४७६९२४ एक्स्टेन्शनः २२९


मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर ✆ : (०२३१) २५४२९०१ | mehtabooksellers@gmail.com

sales@mehtapublishinghouse.com | **www.mehtapublishinghouse.com**

**P-Books & E-Books Available on** : amazon.in | flipkart.com | play.google.com | books.apple.com

सर्व पुस्तक विक्रेत्यांकडे पुस्तके उपलब्ध | WhatsApp us on 9420594665 | G Pay +91 94223 23039

## पुस्तक परिचय




# आयुष्याचा नवा डाव

**शेलजा सेन**

अनुवाद : **सरिता आठवले**

*मानसिक आरोग्य, अस्वास्थ्याची लाज, लांच्छनाची भीती आणि मौनाचे कुंपण यांच्यावर मात करून केलेले संक्रमण*

संपूर्ण जगात डिप्रेशन हे मानसिक अपंगत्वाचे प्रमुख कारण मानले जाते. आज जगात चार माणसांपैकी एकाचे आयुष्य कधी ना कधी मानसिक अनारोग्याने ग्रासलेले असते, हे तुम्हाला माहीत आहे? भारतातील तरुणांच्या अपमृत्यूंच्या संदर्भात आत्महत्या हे सर्वांत मोठ्या प्रमाणात असलेले कारण आहे. आकडेवारीनुसार दर तासाला एका विद्यार्थ्याचा मृत्यू होतो आणि कारण असते आत्महत्या. संपूर्ण जगभरात होणाऱ्या स्त्रियांच्या आत्महत्यांपैकी चाळीस टक्के आत्महत्या भारतात होतात.

असे असताना मानसिक आरोग्याच्या संदर्भात काहीच होताना का दिसत नाही? आपण याकडे अनुल्लेखाने दुर्लक्ष का करतो? आपल्या स्वत:च्या बाबतीत आणि आपल्या भोवताली असे घडत असले तरी आपण त्याबद्दल मौन का बाळगतो? शेलजा सेन यांनी गेल्या तीस वर्षांत त्यांना या बाबतीत आलेले अनुभव या पुस्तकात आपल्यासमोर मांडले आहेत. पेशंटच्या व्यथा आणि सेन यांच्या उपचारातील विवेक आणि समजूतदारपणा यामुळे पेशंट्सना या व्यथांपासून मिळालेली मुक्ती यांचे सखोल विवेचन या पुस्तकात आपल्याला वाचायला मिळते. झेन बौध्द गुरू तिक नियात हान यांची शिकवण, संवादोपचार आणि परिणामलक्ष्यी लघु उपचार पद्धती यांच्या एकत्रित वापरामुळे सेन यांचे उपचार लक्षवेधी आणि वाचनीय झाले आहेत. मानसोपचार आणि स्वयंमोपचारातील साहित्यात या पुस्तकामुळे मोलाची भर पडली आहे.

कुणावरही त्याच्या एखाद्याच अवगुणाचा शिक्का मारून केवळ तेवढीच बाब त्या व्यक्तीची ओळख म्हणून सांगितली जाऊ नये. मनात घर करून राहिलेल्या एखाद्या वाईट घटनेविरुध्द बाळगलेले मौन सोडून, त्याविरुध्द पवित्रा घेऊन विस्कटलेले मन सावरायला हवे, आपल्या आयुष्यातील इतर अनेक उल्लेखनीय घटना प्रकाशात आणण्याचा हक्क आपण परत मिळवायला हवा, अशा महत्त्वाच्या बाबींवर हे पुस्तक भर देते. मानसिक रुग्णांच्या यातनांना रोज सामोरे जाणाऱ्या आणि सतत नवीन उपचारांच्या शोधात असणाऱ्या परिचारकांनी आणि डॉक्टरांनी हे पुस्तक नक्कीच वाचायला हवे. तुम्हाला अधिक आनंददायी आणि अर्थपूर्ण जीवनाची ओढ असेल तर हे पुस्तक तुमच्या जीवनातील रंगत अधिकच वाढवेल.

'आयुष्याचा नवा डाव' सर्वसामान्य माणसाचेही विझू घातलेले धैर्य पुन्हा प्रज्वलित करते आणि स्वत:चा ध्रुवतारा शोधण्यासाठी उद्युक्त करते.

# पुस्तक परिचय

'THE TIME QUINTET' **या पंचकडीतील पहिले पुस्तक**




## कालपटलावरील सुरकुती

**मॅडेलिन लेन्गल** । अनुवाद : **मुग्धा गोखले**

■

> *विज्ञानातील कल्पनारम्यतेच्या आधारे आपल्या ग्रहाला धोका पोचवू पाहणाऱ्या दुष्ट शक्तीविरोधात लढा देणाऱ्या तीन मुलांची कथा.*

मेग, तिचा लहान भाऊ चार्ल्स वॉलेस आणि कॅल्विन नावाचा एक मुलगा यांना घेऊन तिच्या गायब असलेल्या शास्त्रज्ञ बाबांना शोधून घरी आणण्यासाठी प्रवासास निघते.


मेग मरीचे व्यक्तिमत्त्व फारसं आकर्षक नाही. तिच्या दातांना पट्ट्या बसवल्या आहेत, तिला चश्मा आहे आणि तिचे केस झिपरे आहेत.

शाळेत तिच्याकडून सतत चुका होतात. प्रत्येकाला ती जराशी विचित्र आणि मूर्ख वाटते. लहान वयातच तिला इतर लोकांच्या तुच्छ नजरांचा, टोमण्यांच्या रूपातल्या दुष्टपणाचा सामना करावा लागला आहे. मात्र तिचे आपल्या कुटुंबावर विशेषतः आपल्या बाबांवर, लहान भावावर खूपच प्रेम आहे. तिच्या बाबांविषयी गावातले लोक वेड्यावाकड्या चर्चा करतात, दुसऱ्या एखाद्या बाईबरोबर ते पळून गेलेले असल्याचे तर्क लढवीत राहतात. त्यामुळे ती चार्ल्स वॉलेस आणि कॅल्विन यांना घेऊन आपल्या बाबांना शोधायला बाहेर पडते. त्यांना सौ. व्हॉट्सइट, सौ. हू, सौ. विच, हॅपी मीडियम, आंट बीस्ट यांच्या रूपात चांगुलपणा भेटतो. तिला खऱ्याखुऱ्या दुष्ट शक्ती माहीत नसतात. ते तिघे काळ, अवकाश आणि त्यांच्या मनाच्या मर्यादा पार करतात. हू, विच, आंट बीस्ट  या सगळ्या या मुलांना मदत करतात. मानवापेक्षा प्रगत असे हे जीव या मुलांना पृथ्वीवरून निराळ्या ग्रहावर घेऊन जातात, जिथे मेगचे बाबा प्रयोग करत असताना कॅमॅझॉट्झ या ग्रहावरील 'इट'च्या ताब्यात अडकतात. त्यांच्या या प्रवासाचा कळसाध्याय म्हणजे 'इट'बरोबर दिलेला लढा. 'इट' या थंड, मतलबी, शरीरविहीन मेंदूनं सगळ्या  विश्वावर काळ्याकुट्ट सावलीची छाया पसरलेली असते. जगातल्या सर्वांनी तंतोतंत समान वागावं, फक्त त्याच्यावरच विश्वास ठेवावा, अशी त्याची इच्छा असते.

तिचे बाबा 'इट'च्या ताब्यात असतात. त्यांना सोडवण्यासाठी सौ. व्हॉट्सइट, सौ. हू, सौ. विच यांनी दिलेल्या वराची त्यांना मदत होते; मात्र तिचा भाऊ चार्ल्सवर 'इट' ताबा मिळवतो. काळाच्या पकडीतून तिचे बाबा, मेग व कॅल्विन कसेतरी सुटका करून घेतात; मात्र चार्ल्स 'इट'च्या ताब्यात अडकतो. आता त्याची सुटका फक्त मेगच करू शकेल, असे सौ. व्हॉट्सइट सांगते. ती सांगते की मेगकडे अशी गोष्ट आहे, जी 'इट'कडे नाही. 'इट' आपल्या मायाजालात सगळ्यांना असे फसवतो, की ते त्याच्या विरुद्ध जाऊच शकत नाही. मेगला ती गोष्ट कोणती, ते स्वतःला शोधावे लागते. 'इट'ला विरोध करणे, ही ती गोष्ट. त्याचा वापर करून ती आपल्या भावाला- बाबांना सोडवून केल्विनसह पृथ्वीवर सुखरूप परत येते. मेग आणि चार्ल्सच्या हरवलेल्या बाबांचा शोध घेणं, ही पुस्तकातली महत्त्वाची क्रिया आहे, आणि ती 'टेसरॅक्ट' नावाच्या एका गोष्टीवर अवलंबून असते. 'टेसरॅक्ट' म्हणजे पाचव्या मितीचा वापर करून काल आणि अवकाशातून प्रवास करणं, ही गोष्ट विज्ञानातील कल्पनारम्यतेच्या आधाराने पुस्तकात मांडली आहे.

## पुस्तक परिचय

'THE TIME QUINTET' **या पंचकडीतील दुसरे पुस्तक**




# द्वारातील वादळ

**मॅडेलिन लेन्गल** । अनुवाद : **मुग्धा गोखले**

■

*अद्‌भुत कल्पनाविहारातून जादुई विश्वाची सफर घडवणाऱ्या अफलातून कादंबऱ्यांची मालिका*
THE TIME QUINTET *प्रथमच मराठीत*

मेगला आपला धाकटा भाऊ, चार्ल्स वॉलेसचं सामाजिक व्यक्तिमत्त्व आणि त्याचा शाळेतील वावर याबाबत काळजी वाटत असते. चार्ल्स इतर मुलांपेक्षा वेगळा असल्याने त्याला शाळेतही मुलांकडून धमकावले जात असे. प्राथमिक शाळेचे नवीन मुख्याध्यापक

अर्थात श्री. जेनकिन्स यांनी अनेकदा मेगला शिस्त लावायचा प्रयत्न केलेला असतो आणि ते चार्ल्सबद्दलही अढी बाळगून असतात, त्यामुळे मेगला खात्री असते की तिच्या संपूर्ण कुटुंबाविरुद्ध त्यांच्या मनात राग आहे. तरीही ती चार्ल्ससंदर्भात जेनकिन्सना भेटते; पण त्यांच्या रुक्ष वागण्यामुळे मेगच्या हाती निराशाच येते. दरम्यान मेगला चार्ल्सच्या आजाराविषयी कळते. मेग आणि चार्ल्सच्या सूक्ष्मजीवविज्ञानी असलेल्या आईच्या मतानुसार, चार्ल्सला मायटोकोन्ड्रिया आणि फॅरंडोलाचा विकार असू शकतो. (फॅरंडोला हा मायटोकॉन्ड्रियामध्ये मायक्रो-ऑर्गेनेल्स असतो, जो या पुस्तकातील कल्पनाविश्वातील जीव आहे.)


विध्वंसक इक्थ्रॉय चार्ल्स वॉलेसच्या शरीरात घुसून त्याला संपवण्याच्या प्रयत्नात असतात. प्राणघातक रोगानं आजारी पडायच्या अगदी थोडंसं आधी, मेग मरीच्या छोट्या भावाला, म्हणजेच चार्ल्स वॉलेसला, भाज्यांच्या बगीच्यात ड्रॅगन्स दिसतात. ते ड्रॅगन्स म्हणजे प्रोगिनॉस्कीस असतो. तो प्रोगिनॉस्कीस, खूप पंख, अनेक डोळे, हवा आणि आगीचा बनलेला असतो. तो देवदूत असतो. आता मेग, प्रोगिनॉस्कीस, आणि तिचा मित्र कॅल्विन, यांच्यावर चार्ल्स वॉलेसचा जीव वाचवायची जबाबदारी येते.

याच काळात चार्ल्सच्या शाळेचे मुख्याध्यापक जेनकिन्स यांचा मेगला विचित्र अनुभव येतो. जेनकिन्सवर इक्थ्रॉयनी गंभीर नकारात्मक प्रभाव पाडलेला असतो. मेगपुढे जेनकिन्सवरील इक्थ्रॉयचा प्रभाव कमी करून इक्थ्रॉयविरोधातल्या लढ्यात जेनकिन्सना सहभागी करून घेण्याचीही जबाबदारी असते. हे इक्थ्रॉय चार्ल्सच्या शरीरात खोल गेलेले असतात. त्यामुळे मेग आणि केल्विनला चार्ल्सच्या शरीरात खोल जाऊन इक्थ्रॉयचा पराभव करणं भाग पडतं. इक्थ्रॉय हे सृष्टीचा तिरस्कार करणारे असतात. इक्थ्रॉय पृथ्वीवरील वैविध्य नष्ट करून सर्वांना एकसारखं करण्याच्या प्रयत्नात असतात. इक्थ्रॉयच्या प्रभावामुळे स्वतःचं अस्तित्व विसरलेल्या गोष्टींचं पुन्हा नामकरण करून त्यांचं स्वतंत्र अस्तित्व पुन्हा मिळवून देण्यासाठी मेग लढा देते. या लढ्यात त्यांना निर्मितीची लय, अतीव सुंदर असा सुसंवाद, आनंद आणि विश्वाचं मधुर गीत हे सगळं पुन्हा प्रस्थापित करायचं असतं.

●

## पुस्तक परिचय

'THE TIME QUINTET' **या पंचकडीतील तिसरे पुस्तक**




# वेगाने कलणारा ग्रह

**मॅडेलिन लेन्गल** । अनुवाद : **मुग्धा गोखले**

मरी कुटुंबातल्या मेगचं कॅल्विनशी लग्न झालंय. कॅल्विन शास्त्रज्ञ झालाय आणि तो एका परिषदेसाठी ब्रिटनला गेलेला आहे. मेग गर्भवती आहे आणि कुटुंबातील शेंडेफळ, म्हणजेच चार्ल्स वालेस, पंधरा वर्षांचा झालाय. जुळी मुलं सँडी आणि डेनीस कॉलेजमध्ये शिक्षण घेतायत. आभारप्रदर्शनासाठी सगळे कुटुंबीय एकत्र जमलेले असतात. वातावरण वादळी असतं. या खास प्रसंगासाठी कॅल्विनच्या आईला, म्हणजेच सौ. ब्रॅन्वेन मॅडॉक्स ओ'कीफ यांना, मरी कुटुंबीयांनी जेवणासाठी आमंत्रित केलेलं असतं.

सौ. ओ'कीफची या संपूर्ण कथानकात महत्त्वाची भूमिका आहे.

राष्ट्राध्यक्षांचा फोन येतो. त्यांना श्री. मरी यांच्याशी सल्लामसलत करायची असते. व्हेसप्युजिया या देशाचा हुकूमशहा मॅड डॉग ब्रॅन्झिलो याने क्षेपणास्त्रांचा वापर करून अणुयुद्ध सुरू करण्याची धमकी दिलेली असते. आत्तापर्यंत गप्प बसून असलेल्या सौ. ओ'कीफ एक काव्यरूपी आयरिश मंत्र म्हणू लागतात. हा मंत्र त्यांना त्यांच्या आयरिश आजीकडून मिळालेला असतो. पॅट्रिकचा मंत्र. हा मंत्र संकटापासून बचाव करतो असं त्या सांगतात. त्या चार्ल्स वॉलेसवर संकटाचं निवारण करण्याची जबाबदारी सोपवतात. अचानक त्या चार्ल्सला चक असं म्हणू लागतात.

त्या रात्री चार्ल्स तारे पाहायच्या खडकापाशी जातो आणि तो मंत्र म्हणतो आणि तिथे एक पंख असलेला एकशिंगी घोडा अवतरतो. त्याचं नाव गॉडियर असतं. हे संकट टाळण्यासाठी चार्ल्सने काल-प्रवास करून वेगवेगळ्या काळात जाऊन 'बदलण्यायोग्य' अशी व्यक्ती किंवा घटना शोधून काढायला हवी, आणि योग्य बदल घडवून भविष्यातला धोका टाळायला हवा असं तो चार्ल्सला सांगतो. त्यासाठी चार्ल्सने त्याच्या मानसिक शक्तींचा, कायथिंगचा वापर करून त्या त्या काळातील विशिष्ट व्यक्तींच्या आत सूक्ष्मरूपाने जायला हवं असंही सांगतो.


त्यांच्या या कालप्रवासादरम्यान कायथिंगच्या माध्यमातून मेग सतत चार्ल्सच्या सोबत राहणार असते. इक्थ्रॉय या दुष्ट शक्ती सतत चार्ल्सच्या कालप्रवासात अडथळे आणत असतात. गॉडियर आणि चार्ल्स साधारण एक हजार वर्षांपूर्वीच्या काळात जाऊन पोचतात. तिथे त्यांना हार्सेल्स भेटतो. नंतर ते दोघे जराशा पुढच्या काळात पोचतात. त्यांना त्या काळात वेल्सचा मॅडॉक भेटतो. त्याच्या काळातल्या रोमांचक घटनांनंतर ते आणखी किंचित पुढच्या काळात पोचतात. तिथे त्याला वेल्श वसाहतीतला ब्रॅन्डन स्होकाय भेटतो. त्याच्या शरीरात जाऊन चार्ल्स त्या काळातल्या नाट्यमय घडामोडींचा साक्षीदार बनतो. संकट निवारण्यासाठी दोन्ही काळात चार्ल्स त्या मंत्राचा वापर करण्यासाठी अनुक्रमे मॅडॉक आणि ब्रॅन्डनला उद्युक्त करतो. त्यानंतर चार्ल्स आणि गॉडियर आणखी पुढच्या काळात जातात. तिथे त्यांना चक आणि त्याची बहीण बीझी भेटतात. सौ. ओ'कीफ म्हणजेच लहानपणीची बीझी असं चार्ल्सच्या लक्षात येतं. चकच्या शरीरात जाऊन चार्ल्स त्यांच्या संघर्षाचा हिस्सा बनतो.

त्यानंतर चार्ल्स १८६५ सालात जातो आणि मॅथ्यू मॅडॉक्स लेखकाच्या शरीरात जातो. अमेरिकन नागरी युद्धाची पार्श्वभूमी असलेल्या कालखंडातील रोमांचकारी घडामोडींचा तो साक्षीदार असतो. मॅथ्यूच्या शरीरातला चार्ल्स झिलाचं ब्रॅनशी लग्न लावून देण्यासाठी मॅथ्यूला उद्युक्त करतो आणि महत्प्रयासाने वर्तमानात परत येतो. भूतकाळातील चुकीच्या घटना सुधारल्यामुळे अणुयुद्धाचं संकट दूर होतं.

पूर्ण कथानकात सद्‌गुणांच्या विजयासाठी त्या काव्यमय मंत्राचा वापर केलेला आहे. इतिहासाचा, तत्कालीन सामाजिक प्रथांचा, पंचमहाभूतांच्या संकल्पनेचा सुरेख वापर करून काव्यमय शैलीत लिहिलेले हे कथानक वाचकांना खिळवून ठेवते.

# तू भ्रमत आहासी वाया

**१४वी आवृत्ती**




## व. पु. काळे

'लोकांना आयडेंटीटी असते की. डॉक्टर, वकील, अकाउंटंट...'


'ती त्यांची डिग्री झाली आणि नंतर व्यवसाय झाला. ह्याच यादीत मग नेते, पुढारी, आमदार, खासदार, मंत्री, पत्रकार सगळ्यांना टाकता येईल. नगरसेवकांपासून थेट काही काही मंत्र्यांपर्यंत तर शिक्षणाचाही संबंध नाही. आयडेंटीटीचं नातं माणसांशी आहे असं मी मानते. सुशिक्षितांपैकी अनेकांची ओळख ते त्यांचा व्यवसाय कोणत्या तऱ्हेनं करतात हे समजलं की तिथेच होते. मग त्यांच्यातल्या माणसाशी नातंच ठेवू नये, हे समजतं. व्यवसायाचा वेळ वगळला तर मागं उरणाऱ्या कालावधीत तुम्ही जे असता, ती तुमची आयडेंटीटी. त्यामुळे एरवीही कुणाच्या तरी आठवणीनं मनानं कात टाकावी, अशी फार थोडी माणसं उरतात. अनेक माणसांचा आपण निष्कारण विचार करतो आणि मेंदू शिणवतो. ही वाया जाणारी मेंदूची शक्ती वाचवली तर आपण कितीतरी टवटवीत राहू, ही तुमची शिकवण सर, उभ्या आयुष्याची शिदोरी आहे.'

एकाच महिन्यात तिसरी आवृत्ती

मराठी वाचकांच्या मनावर
अधिराज्य गाजवणारे दोन 'विश्वास'...
आणि दोन साहित्यकृती...


दुसरी आवृत्ती

कर हर मैदान फ़तेह









विश्वास
नांगरे
पाटील

विश्वास
पाटील



पृष्ठसंख्या: २४४ । किंमत: ₹ २९९ । Book Available

पृष्ठसंख्या: ३१२ । किंमत: ₹ ३९५ । Book Available

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ✆ : (०२०) २४४७६९२४ एक्स्टेन्शन: २२९

मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर ✆ : (०२३१) २५४२९०१ | mehtabooksellers@gmail.com

sales@mehtapublishinghouse.com | **www.mehtapublishinghouse.com**

**P-Books & E-Books Available on** : amazon.in | flipkart.com | play.google.com | books.apple.com

सर्व पुस्तक विक्रेत्यांकडे पुस्तक उपलब्ध | WhatsApp us on 9420594665 | G Pay +91 94223 23039

## पुस्तक परिचय

'THE TIME QUINTET' **या पंचकडीतील चौथे पुस्तक**




# अमाप पाणी

**मॅडेलिन लेन्गल** । अनुवाद : **मुग्धा गोखले**


मरी कुटुंबाची गोष्ट. मरी कुटुंबातली मुलं आता मोठी झाली आहेत. मेग कॉलेजमध्ये शिकू लागली आहे. असामान्य बुद्धिमत्तेच्या शास्त्रज्ञ आई-वडिलांची सॅंडी आणि डेनीस ही मधली जुळी मुलं मात्र सर्वसामान्य मुलांसारखी असतात. त्या दोघांना बागकामाची, खेळाची आवड असते. पौगंडावस्थेतील ही जुळी मुलं त्यांच्या आई-वडिलांच्या प्रयोगशाळेत असताना अनवधानाने एका चालू प्रयोगात ढवळाढवळ करतात आणि त्यामुळे काळाच्या सीमा ओलांडून अतिप्राचीन काळातल्या

वाळवंटात जाऊन पोचतात. हा काळ असतो 'नोहा आणि त्याचे जहाज' या बायबलमधील पौराणिक गोष्टीतला.... महापुराच्या थोडा आधीचा काळ. वाळवंटातल्या कडाक्याच्या उन्हामुळे त्रस्त झालेल्या मुलांना तिथला रहिवासी जॅफेथ भेटतो आणि तो मुलांना एकशिंगी घोड्यांवरून त्याच्या मरुवनाकडे घेऊन जायला निघतो. मधेच डेनीस आणि त्याचा एकशिंगी घोडा गायब होतो. डेनीस आणि त्याचा घोडा एका दुसऱ्याच झोपडीत जाऊन पोचतात. तिथली माणसं त्याला कचऱ्याच्या ढिगात फेकून देतात. सँडी मात्र जॅफेथच्या लेमेक आजोबांच्या तंबूत राहतो. लेमेक आजोबा सँडीच्या उष्माघातावर उपचार करतात. उष्माघाताने बेशुद्ध होऊ लागलेला डेनीस कसाबसा एकशिंगी घोड्याच्या मदतीने आपली सुटका करून घेतो. तो घोडा त्याला एका प्रेमळ कुटुंबात पोचवतो. ते कुटुंब असतं नोहाचं. नोहा लेमेक आजोबांचाच मुलगा असतो आणि यथावकाश सँडी आणि डेनीस पुन्हा एकत्र येतात. हा काळ महापुराच्या आधीचा काळ असल्याचं त्यांच्या लक्षात येतं. नोहा आणि लेमेक आजोबांना त्यांच्या एल देवाचे गूढ संदेश ऐकू येत असतात. देव नोहाला अतिभव्य जहाज बांधायची सूचना देतो. कथानकात पुराणकथांमधील अलौकिक देवदूतांची, अतिमानवी दुष्ट शक्तींची, काही गूढ प्राण्यांची सुरेख गुंफण केली आहे. दुष्ट नेफिलिमना या दोन मुलांवर विश्वास नसतो. ते सतत जुळ्या मुलांचा विनाश करण्याच्या योजना आखत असतात. दोन्ही मुलं नोहाच्या मुलीच्या, यलिथच्या प्रेमात पडतात; पण ते शक्य नसल्याचं जाणवून दोघेही ते व्यक्त करत नाहीत.

डेनीस, नोहाचं मन वळवून लेमेक आजोबा आणि नोहामध्ये समेट घडवून आणतो. दोघे मिळून लेमेक आजोबांच्या बागेची देखभाल करतात. लेमेक आजोबांचा मृत्यू झाल्यानंतर सँडीचं अपहरण करण्यात येतं; पण जॅफेथ त्याला सोडवण्यात यशस्वी होतो. ही जुळी मुलं नोहाला ते भव्य जहाज बांधण्यासाठी मदत करतात आणि मग महापुराच्या किंचित आधी देवदूत आणि एकशिंगी घोड्यांच्या मदतीने ही मुलं त्यांच्या स्वत:च्या काळात आणि स्वत:च्या घरी सुखरूप पोचवली जातात. पुराणकथा आणि त्याला दिलेली कण-भौतिकीच्या सिद्धान्तांची सुरेख जोड, पौगंडावस्थेतील मुलांच्या भावविश्वाचं यथायोग्य चित्रण तसेच अप्रतिम कल्पनाविलासामुळे ही अद्‌भुतरम्य कथा वाचकांना अखेरपर्यंत खिळवून ठेवते.

## पुस्तक परिचय

'THE TIME QUINTET' **या पंचकडीतील पाचवे पुस्तक**




# अनुकूल काळ

**मॅडेलिन लेन्गल** । अनुवाद : **मुग्धा गोखले**

■

*अद्‌भुत कल्पनाविहारातून जादुई विश्वाची सफर घडवणाऱ्या अफलातून कादंबऱ्यांची मालिका*
THE TIME QUINTET *प्रथमच मराठीत*

मरी कुटुंबातल्या मेगचं कॅल्विनशी लग्न झालंय. तिची मुलगी पॉली ओ'कीफ आपल्या आजी-आजोबांच्या कनेक्टिकटमधल्या घरी राहायला आलेली असते. तिचे आजी-आजोबा म्हणजे सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. केट मरी आणि डॉ. ॲलेक्स मरी. तिला त्यांच्याकडून विज्ञानाचं प्रगत शिक्षण घ्यायचं असतं. मात्र अकस्मात विलक्षण घटना घडू लागतात. अचानकच तिला झॅकरी ग्रे भेटायला येतो. त्याची आणि पॉलीची भेट एक वर्षापूर्वी ग्रीसमध्ये झालेली असते. आजी-आजोबांच्या घराजवळच्या परिसरात पॉलीला तीन हजार वर्षांपूर्वीच्या काळातले ॲनारल आणि कॅरॅलिस हे दोन ड्र्यूइड्स आणि टाव हा योद्धा भेटतात. यथावकाश तिच्या लक्षात येतं की मरी कुटुंबाशी घरोबा असलेल्या डॉ. लुईस यांचा भाऊ बिशप नेसन कोलुब्रादेखील त्या प्रागैतिहासिक काळातल्या लोकांच्या संपर्कात असतो. तिथे बिशपना दगडांवर कोरलेली ओगम लिपी सापडते आणि तिचा अभ्यास करताना ॲनारलच्या जमातीशी त्यांचा संपर्क आलेला असतो. ही जमात स्वत:ला 'वाऱ्याचे लोक' असं म्हणवून घेत असते.

एक दिवस अचानकपणे पॉली तीन हजार वर्षांपूर्वीच्या काळात टेसरॅक्टच्या माध्यमाद्वारे खेचून नेली जाते आणि जरा वेळाने परत वर्तमानकाळात येते. हे कळल्यावर तिचे आजी-आजोबा आणि कोलुब्रा बहीण-भाऊ ही घटना पुन्हा घडू नये म्हणून आटोकाट प्रयत्न करतात. पॉलीदेखील त्यांनी घालून दिलेल्या नियमांचं पालन करण्याचा निश्चय करते; पण तिला ॲनारल आणि कॅरॅलिस भेटतच राहतात. सॉवेनच्या रात्री तर जणू कुणीतरी खेचून नेल्यागत ती जलतरण तलावापाशी जाते आणि अचानक तीन हजार वर्षांपूर्वीच्या काळात पोचते. तिथे गेल्यावर तिला कळतं की तिथे दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे तलावापलीकडले लोक ॲनारलच्या जमातीवर हल्ले करून अन्नधान्य चोरून नेऊ लागले आहेत. आपल्या जमातीचा बचाव करण्यासाठी टावला पॉलीचा बळी देण्याची इच्छा असल्याचंही तिला कळतं. कॅरॅलिस तिला परत पाठवतो.

हृदयरोगाने त्रासलेल्या झॅकरीला जेव्हा याबद्दल समजतं, तेव्हा तो काळाचं द्वार ओलांडून तीन हजार वर्षांपूर्वीच्या काळात जाण्याबद्दल पॉलीजवळ आग्रह धरतो. ते लोक त्याचा हृदयरोग बरा करू शकतील अशी

आशा त्याला वाटत असते. ते दोघे काळाच्या द्वारातून खेचले जाऊन तीन हजार वर्षांपूर्वीच्या काळात जाऊन पोचतात.

तलावापलीकडचे लोक पुन्हा हल्ला करतात. पॉलीही त्या चकमकीचा हिस्सा बनते. तिला वाऱ्याच्या लोकांबद्दल आपुलकी वाटू लागते. एका युद्धकैद्यासोबत झॅकरी तलावापलीकडे पळून जातो. पलीकडच्या लोकांचा टायनॅक नावाचा प्रमुख त्याच्याशी सौदा करतो. झॅकरीने पॉलीला इकडे आणलं तरच त्यांचा वैदू त्याच्या हृदयावर उपचार करेल अशी अट तो झॅकरीला घालतो. झॅकरी ते कबूल करतो आणि आणखी एका हल्ल्याचा बनाव रचून तो पॉलीला तलावापलीकडे पळवून नेतो. हे सगळं तिचा बळी देण्यासाठी चाललंय असं पॉली त्याला सांगते; पण स्वार्थाने आंधळा झालेला झॅकरी तिकडे दुर्लक्ष करतो. टायनॅकच्या नजरकैदेतून पॉली निसटते आणि अवाढव्य तलाव पोहून परत वाऱ्याच्या लोकांकडे येते. मात्र निस्वार्थ मैत्री निभावण्यासाठी झॅकरीला त्या लोकांच्या तावडीतून सोडवून परत आणलं पाहिजे असं लक्षात आल्यावर ती परत पलीकडे जाते. पौर्णिमेला तिचा बळी दिला जाणार असतो, पण वेळेवर पावसाला सुरुवात होते आणि तिच्या रक्षणासाठी टाव, कॅरॅलिस, ॲनारल आणि बिशप कोलुब्रादेखील तिथे पोचतात. पॉली दोन्ही जमातींमध्ये तह घडवून आणते. त्या तहाच्या अटी मान्य केल्या जातात आणि सलोख्याने राहून एकमेकांना मदत करण्याचं वचन दोन्ही जमाती देतात. झॅकरीला आपल्या स्वार्थीपणाचा पश्चात्ताप होतो. त्याच्या हृदयावर उपचार केले जातात. पॉली मात्र झॅकरीला पुन्हा न भेटण्याचा निश्चय करते. काळाचं द्वार ओलांडून पॉली, झॅकरी आणि बिशप कोलुब्रा वर्तमानकाळात परत येतात.

लेखिकेने इतिहास, विज्ञान, ख्रिश्चन धर्मातलं अध्यात्म या सगळ्याची सुरेख सांगड घातली आहे. परिणामकारक लेखनशैलीतून प्रेम, त्याग, क्षमा या सद्‌गुणांची महती वाचकांच्या मनावर ठसते.




**३री आवृत्ती**

## रत्नाकर मतकरी


# जादू तेरी नजर

''महाकवी, महानाटककार, महाशेक्सपिअर-महाचालू! तो म्हणतो, प्रेम ते काय? ये तो बस नजर का धोखा है! तुम्ही म्हणा, प्रेम हृदयात असतं... शेक्सपिअर म्हणतो, ते नजरेत असतं! कधी कोणाची नजर पडेल, जादू होईल आणि प्रेम जन्माला येईल, हे सांगता येत नाही- तशीच त्या प्रेमाला कधी कुणाची नजर लागेल, ते पण आम्हाला नाही रे बाबा माहीत! सगळा मामला नजरेचा! असं आम्ही नाही म्हणत! खुद्द शेक्सपिअर- सगळ्या नाटककारांच्या बापाचा बाप- त्याच्या 'मिडसमर नाइट्स ड्रीम' या नाटकात म्हणतो...''

शेक्सपिअरच्या नाटकाची अद्भुतरम्यता, काव्यमयता न गमावता, त्यातील प्रेमाविषयीचे हे फटकळ तत्त्वज्ञान आत्मसात करून मतकरी ते आपल्या स्वत:च्या शैलीत मांडतात. आजच्या पात्रांच्या आधुनिक संवेदनांसह.

शेक्सपिअरच्या जगप्रसिद्ध सुखात्मिकेशी समांतर असे आधुनिक जग रचणारे 'जादू तेरी नजर', व्यावसायिक रंगभूमीवर पाहावयास मिळालेले एक प्रसन्न, रंगीतसंगीत आणि अर्थपूर्ण नाट्यानुभव ठरले आहे.

**किंमत : ९०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# तन-मन

**३री आवृत्ती**

रत्नाकर मतकरी

**आजच्या स्त्रीची बंडखोरी**

हे नाटक शीर्षकातील शब्दजोडीप्रमाणेच दुपेडी विणीचे आहे. वैयक्तिक नजरेतून एक व्यापक सामाजिक मानसिकतेचा भेदक चेहरा आपल्यासमोर उभा राहतो. नवरा-बायकोच्या वैयक्तिक संबंधांची एक वेगळीच बाजू हे नाटक प्रभावीपणे मांडते.

**किंमत : ८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

अभिप्राय




# गाभुळलेल्या चंद्रबनात

## तमाशा कलेचा दस्तऐवज

ढोलकी-हलगीचा कडकडाट आणि नृत्यसम्राज्ञीचा पदन्यास, नेत्रपल्लवी, सोंगाड्याच्या हजरजबाबी जुबानीने उडवलेले हास्याचे फवारे, सवाल-जवाब, रंगबाजीने त्यात भरलेला रंग आणि गण, गवळणी, लावण्या, पोवाड्याच्या सुरावटीने सजलेला, पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक वगनाट्यांनी गहिरेपण आलेला तमाशाचा फड हा मराठमोळ्या, महाराष्ट्रीय मनाला भुरळ घालणारा जिवंत लोककला प्रकार. म्हणूनच तर रसिक जनांचं वढाळ मन तमाशाच्या तंबूकडे धावत असतं. अशी ही जिवंत लोककला जीतीजागती ठेवली ती या कलारसिकांनी आणि गावकुसाबाहेरच्या प्रेक्षक, कलावंतांनी.

तमाशा जसा रसिकांच्या मनाला भुरळ घालतो तसाच तो अभ्यासकांच्या मनालाही भुरळ घालतो. त्यासाठी विद्यापीठीय अभ्यासक जसे पायाला भिंगरी बांधत त्याचा शोध घेतात तसेच काही रसिक अभ्यासकही जिज्ञासा म्हणून संशोधन करत असतात. अनेकांनी तमाशावर पीएच.डी. केल्या. तर काहींनी फडमालकांची चरित्रे वाचकांसमोर

आणली. काहींनी त्यातील कलावंतांवर लेखणीचा झोत टाकला.




सुप्रसिद्ध कादंबरीकार, ज्यांच्या सिद्धहस्त लेखणीतून साकारलेल्या ऐतिहासिक, सामाजिक कादंबऱ्यांनी वाचकांच्या मनात घर केलं ते विश्वास पाटील यांची 'गाभुळलेल्या चंद्रबनात' ही कादंबरी तमाशा कलेचा दस्तऐवज घेऊन आली आहे. यापूर्वीही त्यांनी 'चंद्रमुखी' नावाची कादंबरी लिहून या तमाशा कलेकडे वाचकांच्या नजरा वळवलेल्या होत्या. आता आलेली त्यांची 'गाभुळलेल्या चंद्रबनात' ही तीनशे पानांची कादंबरी मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केली आहे. संगीतकार नौशाद आणि राम कदमांना विश्वास पाटील यांनी ही कादंबरी अर्पण केली आहे.

या कादंबरीत जसे तमाशाच्या पडद्याआडचे, राहुटीतले जग येते, तसेच अनेकदा स्टेजवरचा तमाशाही येतो. त्यातील 'मोहना बटाव', 'असा झुंजला महाराष्ट्र माझा', 'संत तुकाराम' अशा काही वगनाट्यांची कथानकं काही अंशी गरजेपुरती येतात. ज्यामुळे वाचकांना संपूर्ण वगनाट्यांची कल्पना येऊ शकते.

खरं तर उमर साठीतला बाकेराव बानगीकर आणि त्याच्या प्रेमसागरात मासोळीसारखी डुंबण्यासाठी आलेली सतरा-अठरा वर्षांची नृत्याची बिजली रंगकली आणि या दोघांनाही माशासारखं पाण्याबाहेर काढून तडफडायला लावणारा हिशोबी, धूर्त खलनायकी पात्र आणि वास्तवातलं खलनायकी जगणं जगणारा ऐशारामी, विलासी गगनआप्पा या मुख्य पात्रांच्या अनुषंगाने अनेक पात्रं येतात. या कादंबरीचा सोनेरी गोफ पाटलांनी कुशलतेने विणला आहे.

बाकेरावसारखा हजरजबाबी सोंगाड्या, गोड गळ्याची गायकी असलेला स्वरसम्राट, आपला फड, वगनाट्य सर्वोत्तम होण्यासाठी सतत धडपडणारा, त्यासाठी मान-अपमान, नुकसानीची पर्वा न करणारा आणि म्हणूनच रसिकांच्या गळ्यातील ताईत झालेला, रसिक मनावर अधिराज्य गाजवणारा हरहुन्नर कलावंत; पण त्यालाही पुरुषी संशयी मनावर काबू ठेवता येत नाही.

तर दुसरीकडे अप्रतिम सौंदर्याचं चांदणं अंगाअंगावर जन्मतःच घेऊन आलेली, तारुण्याने मुसमुसलेली रंगकली जिच्या रोमारोमात भिनलेली कला. तिचा हा ऐवज तिलाच जगण्याच्या टप्प्याटप्प्यावर नागिणीसारखा डंख मारत रक्तबंबाळ करत राहतो. या प्रेमी युगुलामध्ये सतत बिबवा घालू पाहणारा बाकेरावचा फड पार्टनर गगनआप्पा, रंगकली व बाकेराव यांना एकमेकांपासून दूर करण्यासाठी, तमाशाचा गल्ला आपमतलबासाठी उपयोगात आणण्यासाठी  सतत व्यूहरचना आखणारा, धूर्त असा आहे. या अनुषंगाने या तिघांच्याही संबंधाने अनेक पात्रं येत राहतात. हे तिघंही कधी यशाचे शिखर गाठतात तर, कधी अपयशाच्या खोल दरीत ढकलले जाण्याचा अनुभव घेत राहतात. नदीच्या लाटेनं हळुवार आपलं अंग बदलत पुढे पुढे सरकावं तसं कथानक वाचकांना उत्सुकता वाढवत पुढे पुढे नेत राहतं.

शेवटी रंगकली आणि बाकेरावच्या प्रेमाचाच विजय होतो. अनेक वळणं घेत ते एकमेकांच्या जीवनात पुन्हा येतात. गगनआप्पा मात्र इतरांना फसवता फसवता स्वत:च त्या फसवणुकीच्या दलदलीत अडकतो, ते कधीही न सावरण्यासाठी.

एखादा नाट्य कलावंत अथवा तमाशा कलावंत जणू काही एखाद्या पात्रासाठीच जन्माला आलेला असतो. जसा या कथानकात युवराज पाटणे 'छत्रपती संभाजी महाराजांच्या' भूमिकेसाठी तर बाकेराव 'संत तुकारामांच्या' भूमिकेसाठी.

शेवटी संत तुकाराम महाराज जसे गरुडवाहनातून वैकुंठाला गेले, तसे बाकेराव संत तुकारामांची भूमिका करत असताना अखेरच्या वैकुंठगमनाच्या सीनमध्ये त्यांची प्राणज्योत मालवते.

मानवी स्वभावाचे सुष्ट-दुष्ट नमुने, नात्यातील गुंतागुंत, त्याग-स्वार्थ येथेही आपणास दिसतो.


कादंबरी वाचताना अनेक माहीत असलेले कलावंत आपल्या डोळ्यांसमोर उभे राहतात.

तमाशाच्या फडात जगण्याच्या मजबुरीने काही कलावंत येतात तर काही कलेची हौस म्हणूनही येतात. तर काहींना वारशाने ही कला जोपासावी लागते; पण या तमाशा कलावंतांचं जगणं सामान्य माणसाच्या,

नाट्यकलावंतांच्या, चित्रपट कलावंतांच्या जगण्यापेक्षाही कसं भिन्न आहे, भणंग आहे, 'सुख पाहता जवापाडे, दु:ख पर्वताएवढे' असंच त्यांचं विश्व आहे. विश्वास पाटील यांच्या कसदार लेखणीचा परिसस्पर्श त्याला लाभल्याने वाचकांना बारकाव्याने ते जगणं समजून घेण्यासाठी खूपच मदत झाली आहे, असेच म्हणावे लागेल.

**– के.जी.भालेराव**

# नागकेशर




'नागकेशर' ही कादंबरी नुकतीच वाचली. आपल्या इतर कादंबऱ्यांप्रमाणेच ती आवडली. यापूर्वी आपल्या 'पानिपत', 'पांगिरा', 'झाडाझडती', 'चंद्रमुखी', 'संभाजी', 'महानायक' या कादंबऱ्या मी वाचल्या आहेत. 'झाडाझडती' आणि 'पांगिरा' या आपल्या कादंबऱ्यांत जनमानसाचं प्रभावी चित्रण आलं आहे. विशेषत:, 'पांगिरा' आणि 'झाडाझडती' मधील शेतकऱ्यांचा संघर्ष खूपच प्रत्ययकारी रीतीने आला आहे. 'नागकेशर'मधून आपण दोन पिढ्यांतील राजकीय संघर्षाचं प्रभावी चित्रण केलं आहे. दोन कुटुंबांतील राजकीय संघर्ष असंही त्याला म्हणता येईल. महाभारतात जसा कौरव आणि पांडव यांचा संघर्ष आला आहे, त्याचप्रमाणे हा दोन चुलतभाऊ आणि त्यांच्या बायकांमधील संघर्ष आलेला दिसून येतो. बापुराव डोंगरे-देशमुख आणि बबननाना हे दोन भाऊ... आधी शिक्षक असणारे बापुराव डोंगरे. आपल्या बुद्धिमत्तेच्या बळावर राजकारणात जम बसवतात. सहकार क्षेत्र आणि साखर कारखानदारीच्या माध्यमातून ते खूप श्रीमंत होतात. ते आपल्या मुलाला बाजीरावला त्यांचा राजकीय वारस म्हणून निवडतील, असं बबननानाला वाटत असतं. कादंबरी पुढे नेत असताना या दोन कुटुंबांतील संघर्षाचं आणि त्यातून उद्‌भवलेल्या कट-कारस्थानाचं खूप प्रभावी चित्रण केलं आहे. नाट्यमय घटनांचा क्रम स्तिमित करणारा आहे. बापुरावांचा मुलगा

प्रिन्स याच्या लग्नाचे वातावरण खूप सुरेख आहे. त्यांचा सरंजामी थाट पानापानावर प्रभावी शब्दांत वर्णन केला आहे. प्रिन्ससाठी बापुरावांनी बडोदा येथील श्रीमंताची लेक पसंत केलेली असते; मात्र लग्नघडी जवळ येत असताना प्रिन्स मात्र रमेश दिवसेची बायको शलाका हिच्या प्रेमात पडतो. तिच्या व्यक्तिमत्त्वावर आणि रूपसौंदर्यावर भाळतो. खरं म्हणजे शलाकाला रमेश दिवसेपासून एक मुलगा झालेला आहे; मात्र नवऱ्याची मारझोड आणि छळवाद याला कंटाळून ती न्याय मागण्यासाठी प्रिन्सकडे जात असते. इथे मात्र तिच्या नशिबात वेगळंच मांडून ठेवलेलं असतं. प्रिन्स आपल्या नियोजित वधूला टाळून शलाकाशी लग्न करायचा हट्ट धरतो आणि तडीस नेतो. त्यामुळे बापुराव हबकून जातात आणि मुलाच्या हट्टापुढे हार पत्करतात. हा नव्या आणि जुन्या पिढीतील वैचारिक संघर्ष या कादंबरीत आपण फारच ठळकपणे अधोरेखित केला आहे. तो बापुरावसाठी जसा धक्कादायक आहे तसाच तो वाचकांनाही धक्का देतो. बाप-मुलातील भावा-भावातील असे संघर्ष आपल्याला सर्वांना दिसून येतात. या निमित्ताने मराठा समाजाची मानसिकता, त्यांचा सत्तासंघर्ष आणि स्वभावदर्शन अणि भाऊबंदकी हा सगळाच भाग ग्रेट वाटतो. विशेषत: 'भाऊ भावाचा वैरी' या उक्तीप्रमाणे बबननाना बापुरावला जयश्री प्रकरणास प्रवृत्त करतात आणि बदनाम करण्याचा प्रयत्न करतात, तो वैरभावाचा कहर वाटतो. या एकाच प्रसंगातून दोन गोष्टी लेखक म्हणून आपण साध्य केल्या आहेत. एक म्हणजे बापुरावाच्या मनावर खोलवर परिणाम होतो आणि जन्मभर ते अपराधभावाने त्रस्त होतात. तर बबननाना मात्र सूडभावना, सूडकथा साध्य झाली म्हणून असुरी आनंद घेतो. बापुरावाच्या आयुष्यातील जसे जयश्री प्रकरण आहे तसेच त्याचा पोरगा प्रिन्स याच्या आयुष्यातील शलाका प्रकरण आहे. दुसऱ्याची बायको आणि एक मुलगा असलेल्या बाईशी त्याने लग्न करणे ही बाब त्यांच्यासाठी सामाजिकदृष्ट्या जन्मभरासाठी कमीपणा आणणारी आहे व तिचा लाभ बरोबर घेण्याचा प्रयत्न बबननाना, त्यांची बायको चंचलादेवी, मुलगा बाजीराव आणि सून नेत्रादेवी मोठ्या शिताफीने आणि कटकारस्थाने रचून घेत राहतात. या युद्धावर आधारित कादंबरीचा व्यापक पट पुढे पुढे उलगडत जातो. तो भाग प्रत्ययकारी रीतीने आपण मांडला आहे. या निमित्ताने महाराष्ट्रातील राजकारणातील व्यक्तींचे, निवडणुकांतील लटपटी-

खटपटीचे प्रसार व प्रचार तंत्राचे वास्तववादी चित्रण करण्याची संधी आपल्याला घेता आली. बापुरावाची पत्नी सुजाता देवी आणि मुलगी संध्या यांचं व्यक्तिचित्रण खास झालं आहे. संध्या आपल्या बापाच्या कृतीने तर सुजातादेवी नवऱ्याच्या कृतीने घायाळ झालेल्या अबला स्त्रिया आहेत. त्यातही आपल्या पतीची आणि मुलांची, संसाराची काळजी घेणारी घरंदाज मराठा स्त्री म्हणून सुजाता देवीची व्यक्तिरेखा कायमची लक्षात राहते. प्रिन्स आणि त्याची पत्नी शलाका आपल्या जीवनात दोन पातळीवर संघर्षाला तोंड देताना समर्थपणे उभे राहतात. एकीकडे बबननाना, चंचलादेवी, बाजीराव आणि त्याची महत्त्वाकांक्षी पत्नी नेत्रादेवी यांच्याशी त्यांचा राजकीय वर्चस्वाचा आणि कारखानदारीतून झालेला सत्तासंघर्ष आहे. त्यांच्याशी त्या-त्या पातळीवर लढा देऊन ते यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करतात. तर दुसऱ्या बाजूला शलाकाचा पहिला पती रमेश दिवसे आणि तिचा पहिल्या नवऱ्यापासून झालेला मुलगा अभिषेक यांच्याशीही त्यांचा संघर्ष हा होत राहतो; मात्र या प्रकरणात पती-पत्नी एकमेकांना समजून घेऊन सहानुभूतिपूर्वक आणि आस्थेने त्यांच्याशी वर्तन करून या संघर्षात यशस्वी होतात. विशेषत:, प्रिन्सने आपल्या पत्नीच्या प्रेमासाठी तिच्या पहिल्या नवऱ्यापासून झालेल्या मुलाला स्वीकारणे हे खूपच थोर वाटते. ही बाब असंभवनीय म्हणून अपवादात्मक वाटते. एकीकडे प्रिन्स आणि शलाका अभिषेकवर प्रेम करत असतात. तो मात्र त्यांचा तिरस्कारच करतो. रमेश दिवसे बाजीरावाच्या कंपूत सामील होऊन निवडणुकीस उभा राहतो. ते मात्र त्याचा प्यादा म्हणून, बळीचा बकरा म्हणून उपयोग करत असतात. अभिषेकलाही आपल्या आईची आणि तिच्या पतीची माया कळत नाही. तो विशिष्ट हेतूने त्यांच्याशी वागत राहतो. आपल्या बापाशी झालेल्या संवादातून त्याची वृत्ती-प्रवृत्ती ठळकपणे झळकते. तो म्हणतो, ‘तुमच्यासारखा उगीच भेजाला त्रास देत मी खोल पाण्यात उडी घेत नाही. कोणी कोणाला फसवलं, कोणाला जीव लावला, कोणाला कोणी वाचवलं किंवा नाचवलं, या साऱ्या गोष्टी गेल्या उडत. मला मात्र आपला सुपरप्रिन्स दादा भारी लकी वाटतो. किती भाग्यवान, ज्याला बाजीरावसारखा बाप आणि नेत्रादेवीसारखी आई मिळाली. तेच बघा, माझं लाइफ किती बेकार. माझ्या नशिबाला तुमच्यासारखा खत्रूड बाप मिळाला. उगाच मी तुमच्या पोटी जन्माला आलो.

त्या ऐवजी मी बाजीराव आणि नेत्रादेवीच्या पोटी जन्माला आलो असतो, तर किती मजा आली असती.' अभिषेकच्या बोलण्यातून आजच्या तरुण पिढीचीच भावना प्रातिनिधिक स्वरूपात व्यक्त होताना दिसते व ती वास्तव वाटते. बाजीराव आणि नेत्रादेवीचा पोरगा सुपरप्रिन्ससुद्धा त्याच वाटेचा प्रवासी आहे. कादंबरीतील लहान-मोठी असंख्य पात्रे, त्यांची स्वभावचित्रे खास झाली आहेत. आपापल्या ताणतणावात जगणाऱ्या बायका - माणसांची त्या - त्या प्रसंगातील भावावस्था प्रत्ययकारी रीतीने व्यक्त झाली आहे. रमेशची हत्या आणि बाजीरावची आत्महत्या हा कादंबरीतील महत्त्वाचा भाग वाटतो. आपली निवेदन शैली, संवाद, भाषेचा डौल, शिव्या, म्हणी वाक्प्रचार आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे गतिमान असं कथासूत्र आणि प्रवाही निवेदनशैली यामुळे ही कादंबरी एक प्रदीर्घ असा चित्रपट पाहण्याची अनुभूती देते. कादंबरीचा प्रिन्स, शलाका आणि अभिषेक यांच्यावर बेतलेला शेवटही संपूर्ण कादंबरीला असलेल्या सूडकथेच्या, कटकारस्थानाच्या पार्श्वभूमीवर समर्पक वाटतो. कादंबरीभर असलेला विशिष्ट प्रकारचा ताण आणि तीव्र बोचरेपणा यात सुखद झुळूक अनुभवायला यावी असा हा शेवट प्रभावी झाला आहे. 'आला आला रूखवत, त्यात होते लसूण अन् रामरावाची बाईल चालली श्यामरावाच्या मोटारीत बसून' अशा उखाणेवजा ओळी कथाशयाच्या अंगाने समर्पक वाटतात आणि लक्षात राहतात.

**– सदानंद देशमुख**


ૡ

# सागरी परिक्रमेचा पराक्रम

## एका साहसवीराची यशोगाथा...

मला आजही लख्ख आठवतंय, साधारणतः एम.एस.सी.च्या पहिल्या वर्षाला असेन मी. सकाळी-सकाळी कॉलेजला जायची गडबड असायची. जाता जाता दारात पडलेल्या लोकसत्तेवर नजर फिरवून जायची मला सवय होती. एक दिवस अचानक लोकसत्तेच्या पहिल्या पानावर कुणीतरी अभिलाष टॉमी नामक एका भारतीय नौदलातील अधिकाऱ्याने न थांबता एकल सागर परिक्रमा पूर्ण केल्याची बातमी मी वाचली. त्या बातमीतलं अजून एक नाव माझ्या चांगलं लक्षात राहिले. त्याचं कारण म्हणजे त्या दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर अभिलाषच्या आधी सागरी परिक्रमा पूर्ण करण्याचा विक्रम नोंदवला

गेला होता. अशी सागरी परिक्रमा एकट्याने पूर्ण  करणारे ते पहिले भारतीय. ती व्यक्ती म्हणजे कॅ. दिलिप दोंदे होय. आपल्या दैनंदिन जीवनाला सरावलेले आपण कोणतंही धाडस करायला तयार नसतो; पण याला अपवाद असतात कॅ. दिलिप दोंदे यांच्यासारखे काही साहसवीर. 'भारतात सव्वाशे अब्ज लोकसंख्या असताना, तसेच साडेसात हजार किमी इतका मोठा समुद्रकिनारा लाभलेला असताना २०१०पर्यंत कुणीच कसं एकट्याने सागरी परिक्रमा केली नाही?' हा प्रश्न सातत्याने कुणी ना कुणी कॅ. दोंदेंना विचारत असे. भारतीय नौदलात कार्यरत असलेल्या ॲडमिरल मनोहर आवटी यांनी एकल सागरी परिक्रमा करण्यासाठी नौदलाकडे सातत्याने तगादा लावलेला होता; पण नौदलाने मात्र त्यांना यासाठी कधीही परवानगी दिली नाही. पुढे अशा परिक्रमेचा जेव्हा नौदलाने विचार केला तेव्हा दिलिप दोंदेंना ती संधी देण्यात आली. विचार करा! याआधी कोणत्याही भारतीयाने अशी एकट्याने सागर परिक्रमा केलेली नव्हती. त्या वेळी अशी सागर परिक्रमा करणारे दिलिप दोंदे हे जगातले १७५वे खलाशी ठरले व भारतातील प्रथम. दोंदेंच्या आईने जेव्हा या मोहिमेसाठी होकार भरला तेव्हा यांचा आत्मविश्वास वाढला. घरची, नौदलाची परवानगी मिळाली म्हणजे झालं का सगळं? अजिबात नाही! खरा संघर्ष इथून पुढे सुरू होतो. या संघर्षाचे दोंदे दोन भाग करतात. एक म्हणजे जो लढा त्यांनी जमिनीवर दिला आणि दुसरा जो त्यांनी समुद्राशी दोन हात करताना केला. सगळ्यात आधी या प्रवासाची अचूक माहिती गोळा करणे हे एक मोठे काम होते. दुसरे मोठे काम म्हणजे या प्रवासाला लागणारी अत्याधुनिक शिडाची बोट. अशी बोट ना भारतात उपलब्ध होती, ना त्यासंबंधी कुणी जाणकार व्यक्ती उपलब्ध होता; पण आता शिडाची बोट तर भारतातच बांधायची असा निश्चय दोंदेंनी केला. मग अशी बोट भारतात कोण बांधून देणार? हे आव्हान स्वीकारले ते गोव्यातल्या रत्नाकर दांडेकरांनी. त्यांनी व त्यांच्या क्वेरिअस फायबरग्लासच्या कर्मचाऱ्यांनी अथक मेहनत घेऊन एक भारतीय बनावटीची शिडाची बोट तयार केली व तिचं नामकरण केलं गेलं 'म्हादेई'. म्हादेई हेच नाव का? ते कसं आलं ते पुस्तकात सविस्तर



वाचावं. या सागर परिक्रमेसाठी आलेला खर्च हा जवळजवळ सहा कोटी रुपयांपेक्षा जास्त होता. सागरी परिक्रमा करण्याची कल्पना ज्या कुणाच्या डोक्यात पहिल्यांदा आली असेल त्याला खरोखर मनोमन नमस्कार आहे. त्याने अशी परिक्रमा करण्याचा प्रयत्न केला की नाही, तो त्यात यशस्वी झाला का नाही हे गौण आहे; कारण या अशा परिक्रमा करण्यासाठी उदंड साहस अंगात असावं लागतं. स्वतःहून आपला जीव धोक्यात घालावा लागतो. आपल्यात जगातील नवीन क्षितिजे पादाक्रांत करण्याची ऊर्मी अनावर असावी लागते. तो उत्साह आपल्याला शेवटपर्यंत टिकवता आला पाहिजे. शारीरिक, मानसिक क्षमतेची प्रचंड कसोटी पाहणाऱ्या या मोहिमा असतात. समुद्रात कधी काय होईल काही सांगता येत नाही. वारा, लाटा तुमच्या बोटीला कुठे घेऊन जातील, कशाचा काही भरवसा नाही. समुद्रात ही एकटी बोट पाहून कधी कोणत्या बाजूने समुद्री चाचे हल्ला करतील काही सांगता येत नाही. चहूबाजूने अथांग समुद्र, त्यात हे बोटीवर एकटे. बोलायला कुणीही आसपास नाही. अभिलाष टॉमीने तंत्र सहायकाची भूमिका चोख बजावली होती. साहसावर, धाडसावर प्रेम असणाऱ्या कुणीही हे पुस्तक वाचावं. पुस्तकातील फोटो फार सुरेख आहेत. अनुवाद चांगला झालाय.

**– अजिंक्य कुलकर्णी**

# मी मलाला




'मी मलाला' हे पुस्तक वाचले, अतिशय छान. एकदा वाचायाला हातात घेतले आणि वाचून झाल्यावर खाली ठेवले. अतिशय सहज, सुंदर, ओघवती भाषा मनाची पकड घेते. कुठेही कंटाळवाणं नाही. आपल्याला आणि मलालाला पण भेटायला आवडेल. असेच लिहीत राहा आणि आमच्या ज्ञानात भर टाका. पुन्हा एकदा अभिनंदन!

**– हेमंत ठाकूर**



**८वी आवृत्ती**

# नटरंग

## आनंद यादव

'नटरंग', मराठीतील एक अव्वल दर्जाची, कलात्म आणि शोकात्म कादंबरी. 'नटरंग' मध्ये आनंद यादवांच्या लेखकीय व्यक्तिमत्त्वाची बहुतेक सारी वैशिष्ट्ये प्रभावीपणे व्यक्त झालेली आहेत. प्रसंगांना चित्रवत आकार देण्याची आणि संपूर्ण रसपूर्ण बनवण्याची, त्यांना मनोवैज्ञानिक स्पर्श देण्याची, प्रसंगातील कारुण्य आणि विनोद हेरण्याची लेखकाची क्षमता विलक्षण आहे. त्यामुळे कादंबरीचे वातावरण चैतन्यपूर्ण झाले आहे.

---

**किंमत : २३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




**५वी आवृत्ती**

# मंद्र

**डॉ. एस. एल. भैरप्पा**

अनुवाद : **उमा कुलकर्णी**

कितीतरी वेळानंतर भोसलेचा आवाज ऐकू आला.

'कलेच्या क्षेत्रात यानं आपल्याला स्वर्ग भेटवला! पण कलाकाराच्या अंतरंगात डोकावलं तर तिथं वेगळंच असतं. का हा विरोधाभास?'

'मलाही हाच प्रश्न अनेकदा छळत असतो!' कुलकर्णी म्हणाले. कला आणि कलाकार यामधील अनाकलनीय नात्याचा परखड शोध...

डॉ. एस. एल. भैरप्पा यांच्या प्रतिभासंपन्न नजरेतून!

---

**किंमत : ४७०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## १६ एप्रिल ते १५ मे २०२० दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३० एप्रिल दरम्यान खास सवलत**

**१७ एप्रिल - शशिकांत वामन काळे यांचा जन्मदिन**
'मगरडोह' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

---

**१८ एप्रिल - मीरा सिरसमकर यांचा जन्मदिन**
'हसाल तर वाचाल', 'खुलदाबादचा खजिना', 'नोबेल ललना भाग-१', 'नोबेल ललना भाग-२' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५१०/- । सवलत किंमत २९९/-**

---

**१९ एप्रिल - पारू नाईक यांचा जन्मदिन**
'मी का नाही ?', 'मोहिनी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३८०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**१९ एप्रिल - जिन ली लेथम यांचा जन्मदिन**
'आगे बढो' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

---

**२० एप्रिल - अजय पांडे यांचा जन्मदिन**
'रेझोनान्स' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

---

**२० एप्रिल - सेबॅस्टिअन फॉक्स यांचा जन्मदिन**
'डेव्हिल मे केअर' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १४९/-**

---

**२० एप्रिल - झियाउद्दीन युसफझाई यांचा जन्मदिन**
'लेट हर फ्लाय' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

---

**२१ एप्रिल - ज्ञानदा नाईक यांचा जन्मदिन**
'तजेलदार कॅनव्हास', 'गोष्ट डॉट कॉम भाग १', 'गोष्ट डॉट कॉम भाग २', 'गोष्ट डॉट कॉम भाग ३' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८६०/- । सवलत किंमत ५३९/-**

---

**२१ एप्रिल - मार्क ट्वेन यांचा जन्मदिन**
'हकलबेरी फिनची साहसं', 'टॉम सॉयरची साहसं' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७१५/- । सवलत किंमत ४५९/-**

---

**२१ एप्रिल - ॲलिस्टर मॅक्लीन यांचा जन्मदिन**
ॲलिस्टर मॅक्लीन यांच्या बारा पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३५१०/- । सवलत किंमत १७७९/-**

---

**२२ एप्रिल - चेतन भगत यांचा जन्मदिन**
'फाईव्ह पॉइंट समवन', 'द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ', 'वन नाईट@द कॉल सेंटर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७२०/- । सवलत किंमत ४९९/-**

---

**२२ एप्रिल - डॉ. बाळ फोंडके यांचा जन्मदिन**
बाळ फोंडके यांच्या पंधरा पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३२८५/- । सवलत किंमत १९८९/-**

---

**२३ एप्रिल - यशोधरा काटकर यांचा जन्मदिन**
'बंजाऱ्याचे घर', 'थर्ड पर्सन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३९०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**२३ एप्रिल - जागतिक इंग्लिश भाषा दिन**
'EASY ENGLISH GRAMMAR AND COMPOSITION', 'A Methodical English Grammar', 'Fifty Essays' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७५५/- । सवलत किंमत ४६९/-**

---

**२४ एप्रिल - सचिन तेंडुलकर यांचा जन्मदिन**
'प्लेइंग इट माय वे', 'चेस युअर ड्रीम्स', 'डेमोक्रसीज इलेव्हन' या

पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १५३०/- । सवलत किंमत ९४९/-**

**२४ एप्रिल - कल्याणीरमण बेन्नूरवार यांचा जन्मदिन**
‘अग्निदिव्य’, ‘तरंग’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७४५/- । सवलत किंमत ४७९/-**

**२४ एप्रिल - विला कॅथर यांचा जन्मदिन**
‘देवाची माणसे’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १९९/-**

**२८ एप्रिल - ए. जी. कृष्णमूर्ती यांचा जन्मदिन**
‘धीरुभाईझम’, ‘असामान्य यशप्राप्तीसाठी दहा सामान्य सूत्रे’, ‘प्रतिकूलतेवर मात’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १५९/-**

**२९ एप्रिल - राजा रविवर्मा यांचा जन्मदिन**
‘राजा रविवर्मा’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २१९/-**

**३० एप्रिल - अरुण शेवते यांचा जन्मदिन**
‘चित्तचित्रे’, ‘मद्य नव्हे, हे मंतरलेले पाणी!’, ‘रंगल्या रात्री’, ‘रात्ररंग’, ‘साहेब संध्याकाळी भेटले...’, ‘स्वप्नी जे देखिले’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११८५/- । सवलत किंमत ६९९/-**

**३० एप्रिल - जॉन बायेन यांचा जन्मदिन**
‘द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजमाज्’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**खालील संचांवर १मे ते १५ मे दरम्यान खास सवलत**

**४ मे - रॉबिन कुक यांचा जन्मदिन**
रॉबिन कुक यांच्या दहा पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३४१५/- । सवलत किंमत १७४९/-**

**४ मे - डॉ. एस. आर. देशपांडे यांचा जन्मदिन**

'भारतीय शिल्पवैभव', 'भारतीय गणिका', 'मराठेशाहीतील मनस्विनी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५९०/- । सवलत किंमत ३२९/-**

---

**७ मे - रवींद्रनाथ टागोर यांचा जन्मदिन**

रवींद्रनाथ टागोर लिखित सात पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०५०/- । सवलत किंमत ६४९/-**

---

**८ मे - ध्रुव भट्ट यांचा जन्मदिन**

ध्रुव भट्ट लिखित सात पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १७९०/- । सवलत किंमत ११७९/-**

---

**८ मे - द. ता. भोसले यांचा जन्मदिन**

'ग्रामीण बोलीचा शब्दकोश' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १४०/- । सवलत किंमत ७९/-**

---

**११ मे - कल्पना कुलश्रेष्ठ यांचा जन्मदिन**

'इ.स.२५९५' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १५९/-**

---

**१२ मे - मदर्स डे**

**संच १ :** 'चिकन सूप फॉर द मदर्स सोल भाग १,२,३', 'चिकन सूप फॉर द सोल : इंडियन मदर्स', 'आजीच्या पोतडीतल्या गोष्टी', 'करुणाष्टक'

**संचाची मूळ किंमत १११५/- । सवलत किंमत ७०९/-**

**संच २ :** 'रुचिरा भाग-१ व भाग-२', 'जिच्या हाती पाळण्याची दोरी'..., 'गर्भसंस्कार', 'एक सांगू?'

**संचाची मूळ किंमत १२३०/- । सवलत किंमत ७८९/-**

**संच ३ :** 'सुखद मातृत्व', 'सुखद बालसंगोपन', 'माय डॉटर माय मदर', 'माझ्या लाडक्या लेकींसाठी'

**संचाची मूळ किंमत ७७०/- । सवलत किंमत ४८९/-**

**संच ४ :** 'कळेल का 'त्याला' आईचं मन?', 'माझ्या अम्मीची गोष्ट', 'एका मातेचा लढा', 'कुंती' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १५३०/- । सवलत किंमत ९७९/-**

---

**१२ मे - डॉ. सुभाष दांडेकर यांचा जन्मदिन**

'चाळिशीनंतरची वाटचाल', 'वेदना आणि व्याधींसह चांगलं जीवन', 'व्याधिमुक्त' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८५०/- । सवलत किंमत ५७९/-**

---

**१२ मे - सुप्रिया वकील यांचा जन्मदिन**

'हाऊज दॅट!', 'पॉपकॉर्न', 'उत्सव' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४२०/- । सवलत किंमत २७९/-**

---

**१३ मे - आर. के नारायण यांचा जन्मदिन**

'हलवाई', 'वडाच्या झाडाखाली आणि इतर कथा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १८१०/- । सवलत किंमत १२१५/-**

---

**१३ मे - डॅफने द्यू मोरियेर यांचा जन्मदिन**

'जमेका इन', 'माय कझिन रेशेल', या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत २९९/-**

---

**१४ मे - संभाजी महाराज जयंती**

'संभाजी', 'छ. संभाजी : एक चिकित्सा', 'छावा' (नाटक) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८७०/- । सवलत किंमत ६०९/-**


**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**

**website : www.mehtapublishinghouse.com**


**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.**

**author@mehtapublishinghouse.com**




# कर हर मैदान फ़तेह

श्री. विश्वास नांगरे पाटील लिखित **‘कर हर मैदान फ़तेह’** पुस्तक महाराष्ट्रभरातील वाचकांकडून गौरवले जाते आहे. एका महिन्याच्या अवधीत तीन आवृत्त्या येत असलेलं, हे पुस्तक नुकतंच **ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे** यांच्या हाती पडलं आणि अण्णांनी लागलीच या पुस्तकाच्या पानांना आपलंसं केलं.







'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023
RNI. No. MAHMAR/2000/02739
No. CSO/Pune City/SR/3/2021 - Date : 10/01/2021
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 09/04/2021 Posting Date : 11/04/2021

## नवीन संहिता... नवा आशय...


















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,